रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १२१| पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके। शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते॥

आजचा रंग पांढरा


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि.७ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹


## संमेलनाध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर

**नवी दिल्ली :** दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. पुण्यात साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे यांनी ही माहिती दिली. यंदा संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी डॉ. तारा भवाळकर यांच्यासह प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, माजी प्रशासकीय अधिकारी ज्ञानेश्वर मुळे, सामाजिक कार्यकर्ते अभय बंग यांची नावे चर्चेत होती.तारा भवाळकर यांचा लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांचा गाढा अभ्यास आहे.






## सरपंच, उपसरपंच राहणार वंचित

# प्रशासकीय राजवटीत अडकले मान'धन'

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

**राज्यातील सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याला राज्य सरकारने नुकतीच मंजुरी दिली आहे. त्यामुळे सरपंचाचे मानधन किमान दहा हजार रुपये होणार आहे. मात्र, रायगड जिल्हा परिषदेमध्ये ८११ ग्रामपंचायतींपैकी २४३ ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट आहे. त्यामुळे या ठिकाणी सध्या तरी या वाढीव मानधनाचा लाभ सरपंचांना मिळणार नाही. उर्वरित ५६८ सरपंच आणि उपसरपंच मालामाल होणार आहेत. निवडणुकीच्या तोंडावर जनतेला प्रलोभने दाखवण्यात येत असताना आता ग्रामीण भागातील सरपंच, उपसरपंचांना खुश करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे दिसून येते.**

गेली दोन-अडीच वर्षे राज्यात शिंदे-फडणवीस-पवार यांच्या महायुतीची सत्ता आहे. राज्यात सत्तारुढ सरकार हे असंविधानिक असल्याचे आरोप



### ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी पद एकच असणार

राज्य मंत्रिमंडळाने ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे एकच पद करण्यासही मान्यता दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे पद एकच असावे, अशी मागणी सातत्याने केली जात होती. अखेर आता राज्यातील कार्यरत ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे एकच पद करण्यास कॅबिनेटने मान्यता दिली आहे.

महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांनी सातत्याने केला आहे. अनेक कामे बेकायदेशीरपणे सुरु असल्याने राज्य अधोगतीला जात असल्याकडेही महाविकास आघाडीने लक्ष वेधले आहे. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार, आमदार यांचा प्रशासकीय यंत्रणांवर प्रचंड दबाव असल्याचे काही सरकारी अधिकारी, कर्मचारी खासगीत बोलत असतात. सरकारकडून सत्तेचा दुरुपयोग चालल्याने तेदेखील वैतागले आहेत.

काही दिवसांपूर्वी लाडकी बहीण योजना आणून कोट्यवधी महिलांना सरकारी बहीण बनवले आहे. त्यामुळे निवडणुकीत या बहिणी महायुती सरकारची नैया पार करतील, असा समज सत्ताधाऱ्यांचा आहे. विविध प्रलोभने दाखवण्यात येत असतानाच आता सरपंच आणि उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय सरकारने

**811 ग्रामपंचायती**

**243 ग्रामपंचायतींवर प्रशासक**

**568 सरपंच,उपसरपंच होणार मालामाल**

जाहीर केला आहे. त्यानुसार सरपंच आणि उपसरपंचाना चुचकारण्याचा प्रयत्न महायुतीच्या सरकारने सुरु केल्याचे चित्र दिसत आहे.

ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० पर्यंत आहे, त्या सरपंचाचे मानधन ३००० रुपयांवरुन ६००० रुपये करण्यात येणार आहे. तर उपसरंपचाचे मानधन १००० वरुन २००० रुपये करण्यात येणार आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० ते ८००० पर्यंत आहे. त्या सरपंचाचे मानधन चार हजार रुपयांवरुन आठ हजार रुपये करण्यात आले आहे. तर उपसरपंचाचे मानधन एक हजार ५०० रुपयांवरुन तीन हजार रुपये केले आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या आठ हजारांपेक्षा

पान २ वर

# आमदार निष्क्रिय

## अलिबाग-रोहा रस्ता ठरतोय जीवघेणा

- निवडणुकीपूर्वी दिलेले आश्वासन ठरले फेल
- नागरिकांसह प्रवासी वर्गाकडून संतापाची लाट

### रस्त्याच्या कामावर दृष्टीक्षेप

- अलिबाग ते साईपर्यंतचा रस्ता - ८४ किलोमीटर
- बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा या धर्तीवर रस्त्याचे काम
- रुंदीकरण, डांबरीकरण व मजबुतीकरण यानुसार रस्त्याचे काम
- १५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर
- काँक्रिटीकरणासह रुंदीकरणाचे काम अपूर्णच
- रस्त्यावर ठिकठिकाणी खडी, खड्ड्यांचे साम्राज्य

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मागील निवडणुकीपूर्वी अलिबाग-रोहा रस्ता स्वखर्चाने करून देण्याचे अमिष विद्यमान आमदारांनी दाखविले होते. त्यामुळे मोठ्या विश्वासाने मतदारांनी मतदान करून त्यांना निवडून दिले. परंतु त्यांनी मतदारांची घोर निराशा केल्याचे समोर



"अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. रुंदीकरणाबरोबरच मजबुतीकरण व डांबरीकरण, काँक्रिटीकरण असे या रस्त्याचे काम आहे. रुंदीकरणाच्या नावाखाली ठेकेदाराने रस्त्यावर ठिकठिकाणी खडी टाकली आहे. त्यामुळे या खडीतून वाहने चालवावी लागत आहे. रस्ता उखडल्याने अपघात होण्याची भिती आहे."

- मधुकर ढेबे, माजी सरपंच

आले आहे. अलिबाग-रोहा रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून रस्त्यावर खडीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे हा रस्ता जीवघेणा ठरण्याची भिती निर्माण झाली आहे. पाच वर्षे उलटूनही विद्यमान आमदारांनी सुखकर रस्ता करून न दिल्याने नागरिकांसह प्रवासी वर्गाकडून संतापाची लाट

"निवडणुकीच्या अगोदर सभा घेतली होती. त्या सभेत अलिबाग-रोहा मार्गावरील रस्ता स्वःखर्चाने केला जाईल, असे आश्वासन विद्यमान आमदारांनी दिले होते. निकाल लागल्यावर दुसऱ्या दिवसापासून याचे काम सुरू केले जाईल, असेही त्यांनी सांगितले होते. परंतु तो दिवस काही उजाडला नाही. पाच वर्ष संपत आली. परंतु अलिबाग-रोहा मार्गावरील जनतेच्या चांगल्या रस्त्याचे स्वप्न हे स्वप्नच राहिले आहे."

-देवायनी पाटील, माजी सदस्य चिंचोटी

उसळल्याचे चित्र आहे.

हॅममधून मंजूर होऊन अपूर्णावस्थेत

पान २ वर

## पुणे पुन्हा हादरले; महिलेवर अत्याचार

**पुणे:** गेल्या काही दिवसांपासून पुण्यात सुरू असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटना अद्यापही सुरूच आहेत. आज सलग चौथ्या दिवशी महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. वारजे माळवाडी या भागात ५० वर्षीय नराधमाने ३६ वर्षांच्या महिलेवर घरात घुसून अत्याचार केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार वारजे माळवाडी परिसरातील एका सोसायटीतील ३६ वर्षीय महिला आपल्या घरात भांडी घासत होती. तेव्हा आरोपीने घरात घुसून आई कुठे आहे आई कुठे आहे असा आवाज देत पीडित महिलेला खाली पाडत तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला.यानंतर घाबरलेल्या पीडीतेने आरोपीच्या तावडीतून कशीबशी सुटका करून

पान २ वर

# ५० विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा

## लातूरमध्ये शासकीय वसतीगृहातील घटना

**। लातूर । प्रतिनिधी ।**

लातूरमधील पुरणमल लाहोटी सरकारी पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहणाऱ्या जवळपास ५० विद्यार्थिनींना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाल्याचा प्रकार घडला आहे. त्रास झालेल्या विद्यार्थिनींवर विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरु आहेत. तसेच सर्व विद्यार्थिनींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

शनिवारी हा प्रकार घडला. या वसतीगृहातील विद्यार्थिनींना सायंकाळी ७.३० वाजता जेवण देण्यात आले होते. यात भेंडीची भाजी, चपाती, भात आणि




मसूरच्या दाळीचे सूप या पदार्थांचा समावेश होता. मात्र, रात्री ८.३० वाजताच्या सुमारास अचानक काही विद्यार्थिनींची प्रकृती बिघडली. तर काहींना अचानक मळमळ होऊन उलट्या सुरु झाल्या. त्यानंतर वसतीगृहाच्या अधिक्षकांनी तत्काळ याची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिली.

दरम्यान, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी रुग्णवाहिका बोलावून या विद्यार्थिनींना विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. तसेच याची माहिती विद्यार्थिनींच्या पालकांनाही देण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार मध्यरात्रीपर्यंत जवळपास ५० विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर रविवारी पहाटे जवळपास २० विद्यार्थिनींना वसतीगृहात परत पाठवण्यात आलं.

यासंदर्भात बोलताना विलासराव

पान २ वर

## फलाटामध्ये अडकून तरुण जखमी

**रोहा :** रोहा रेल्वे स्थानकात रविवारी (दि.६) सकाळी दिवा सावंतवाडी पॅसेंजरमधून पडून तरुण ट्रेन व फलाटामध्ये अडकून जखमी झाला आहे. रोहा रेल्वे स्थानकामध्ये दिव्यावरून सावंतवाडीकडे जाणाऱ्या दिवा सावंतवाडी पॅसेंजरमधून एका तरुणाचा पाय घसरून तो रेल्वे व फलाटामध्ये अडकला. या घटनेची माहिती मिळताच टीम व धाटाव अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. त्यांनी अडकलेल्या तरुणाला सुखरूप बाहेर काढले व पुढील उपचाराकरिता रोहा तालुका शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. प्रेम प्रदीप कांबळे (वय २५ रा. म्हसळा, जिल्हा रायगड) असे तरुणाचे नाव आहे.रोहा तालुका शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# चेंबूरमध्ये अग्नितांडव

## गुप्ता कुटुंबातील ७ जणांचा मृत्यू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील चेंबूर परिसरात भीषण आग लागली आहे. चेंबूर परिसरात असलेल्या सिद्धार्थ कॉलनीतील दुमजली घराला आग लागली. या आगीत रविवारी (दि. ६) एकाच कुटुंबातील ७ जणांचा मृत्यू झाला. अथक प्रयत्नांतर अग्निशमन दलाला ही आग विझविण्यात यश आले.

मुंबई महानगर पालिकेच्या अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, चेंबूरमधील सिद्धार्थ कॉलनीमध्ये असलेल्या चाळीतील एका दुमजली घराला पहाटे पाचच्या सुमारास ही आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गाड्या, स्थानिक पोलीस पोहचले. सध्या ही आग विझवण्यात आलेली आहे. आगीतील जखमींना तात्काळ



राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांना मृत घोषित करण्यात आले. रविवार असल्याने गुप्ता कुंटुंब हे रात्री जेवण करुन गाढ झोपले होते. पहाटे साखरझोपेत असताना अचानक घराला आग लागली. ही आग इतकी भयानक होती की, क्षणार्धात संपूर्ण घराला आगीचा विळखा पडला. त्यामुळे काही कळण्याच्या आतच गुप्ता कुटुंबाच क्षणार्धात होत्याच नव्हतं झाले.घराच्या मीटर बॉक्समध्ये शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यानंतर ही आग घरात पसरत गेली. गुप्ता कुटुंबिय झोपेत असल्याने त्यांना आग लागल्याचे लक्षात आले नाही. त्यामुळे हे संपूर्ण कुटुंब आगीत होरपळून मृत्यूमुखी पडले.या

पान २ वर

## पदनियुक्ती मेळाव्यात प्रीतम म्हात्रे यांचे प्रतिपादन

# शेकापक्ष गरिबांच्या हृदयातील पक्ष

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष हा गोरगरीब जनतेच्या हृदयातील पक्ष आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना पैसे किंवा गाड्या देऊन इथे आणले गेले नाहीत. शेतकरी कामगार पक्ष कधी आणत नाही. हे आलेले कार्यकर्ते मनातून आलेले आहेत. शेतकरी कामगार पक्षाचा इतिहासच असा आहे की, कितीही मोठी व्यवस्था करा, मात्र ती अपुरीच पडते. एवढी अफाट गर्दी कार्यकर्त्यांची असते. हा शेतकरी कामगार पक्षाचा इतिहास आहे, असे प्रतिपादन प्रीतम म्हात्रे यांनी केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या



कार्यकर्त्यांचा पदाधिकारी व पदनियुक्ती मेळावा उरण येथील जेएनपीटी टाउनशिप येथील सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी प्रीतम म्हात्रे हे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. यावेळी सभागृह खचाखच भरून, कार्यकर्ते मोठ्या संख्येने बाहेर उभे होते. मेळाव्यात प्रीतम म्हात्रे बोलण्यास उभे राहताच कार्यकर्त्यांनी घोषणाबाजीने सभागृह दणाणून सोडले.

या सभागृहामध्ये अनेक पक्षांच्या सभा झाल्या त्या सभांमध्ये विरोधकांनी पोस्टर हिरो म्हणून मला उपमा दिली. पण मी सांगू इच्छितो हा पोस्टर हिरो नाही तर तरुणांच्या आणि ज्येष्ठांच्या मनातला हिरो आहे. आज माझ्या सहकाऱ्यांनी शेतकरी कामगार पक्षावर निष्ठा असणाऱ्या माझ्या कार्यकर्त्यांनी आज पक्षात प्रवेश केला. तुमच्या मनाने आणि तुमच्यावर होणाऱ्या अन्यायाने शेकापक्षात तुम्ही परतलात. तुमचे मनापासून स्वागत आहे. माझ्या आदिवासी बांधवांचादेखील पक्षप्रवेश आहे. आदिवासी बांधव म्हणजे नेहमी पैशाने विकत घेतला जातो. अशी उपमा त्यांना दिली जाते. पण हे आदिवासी बांधव निष्ठेने, स्वतः कामातून मिळविलेल्या उत्पन्नातून ते शेकापच्या मेळाव्यासाठी उपस्थित राहिले आहेत. त्यांना माझा लाल सलाम आहे, असे प्रीतम म्हात्रे म्हणाले.

विमानतळाच्या नावाखाली खूप राजकारण चालते. महापालिकेत विरोधी पक्ष नेता म्हणून काम करत असताना, पहिली मुलाखत देण्याचे भाग्य प्रीतम म्हात्रे यांना लाभले. त्यावेळी चर्चा करताना, मी सांगितले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जरी असते, तरी त्यांनी लोकनेते दि.बा.पाटील यांच्याच नावाला दुजोरा दिला असता. अशा प्रकारच्या भूमिकेतून मी मत मांडले. प्रीतम म्हात्रे यांना शेतकरी कामगार पक्षाने स्वार्थासाठी विधानसभेसाठी पुढे आणले आहे. असे बोलले जात आहे. परंतु असे नाही. उरणच्या घारापुरी येथे कोरोना काळामध्ये रेशन घेऊन घारापुरीला पहिला जो कोणी पोहचला असेल, तो प्रीतम म्हात्रे पोहोचला. त्या ठिकाणी कोणीही गेलं नाही. पण प्रीतम म्हात्रे पोहोचला. त्यावेळी गरज होती. पैसा असूनदेखील तो उपयोगी येत नव्हता. तर ओळख महत्त्वाची होती. मदत महत्त्वाची होती असे सांगून, वाघाला आपल्याला पिंजऱ्यात बघायची सवय नाही. तो बाहेर येऊन आशीर्वादाची

पान २ वर

# सरदार पटेल यांचा पुतळा उभा राहिला पण छत्रपतींचा नाही

- संभाजीराजेंची संतप्त प्रतिक्रिया
- भाजपच्या नेत्यांवर उपसली आरोपांची तलवार

**। मुंबई। वृत्तसंस्था ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१६ मध्ये अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे जलपूजन केले होते. परंतु अजूनही त्या स्मारकाचे काम सुरु झाले नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांचे वशंज आणि स्वराज्य पक्षाचे नेते संभाजीराजे संतप्त झाले आहे. त्यांनी रविवारी अरबी समुद्रात जाऊन स्मारकाची पाहणी करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रात आणि राज्यात तुमचे सरकार मग स्मारक का होत नाही? सरदार पटेल यांचा पुतळा उभा राहिला पण छत्रपतींचा अजून का उभा राहिला नाही? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.

कोणत्याही प्रकल्पाचे पंतप्रधानांच्या हस्ते जलपूजन होते तेव्हा सर्व परवानग्या असणे गरजेचे होते. अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यासाठी करोडो रूपये खर्च केले गेले. मग कुठे आहे हे स्मारक? त्यामुळे आम्ही स्मारकाच्या शोधसाठी मोहीम आम्ही काढली आहे. राज्यातील १३ कोटी जनतेला सरकारने उत्तर द्यावे. आम्ही कायदा हातात घेणार नाही, असे छत्रपती संभाजीराजे यांनी म्हटले. स्मारकाच्या ठिकाणी

पान २ वर

# पेण बँक उपोषणकर्त्यांकडून रस्ता रोको

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरात २०१० मध्ये बुडीत निघालेल्या पेण बँक विरोधात अनेक उपोषणे झाली आहेत. मात्र शासन या बँकेच्या ठेवीदारांना न्याय देत नसल्याने कर्जत येथे पेण बँक संघर्ष समिती आणि पोलीस मित्र संघटना यांनी उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या सहाव्या दिवशी देखील शासनाकडून उपोषण कायम आहे. दरम्यान, उपोषणाची कोणतीही दखल शासन आणि प्रशासन घेत नसल्याने उपोषणकर्ते यांनी लोकमान्य टिळक चौकात रस्ता रोको केला.



पेण बँक संघर्ष समिती आणि पोलीस मित्र संघटना यांनी सहाव्या दिवशी उपोषण कायम ठेवले आहे. पेण बँक विरोधात आंदोलन सुरू आहे.पेण बँक संघर्ष समिती आणि पोलीस पोलीस मित्र संघटना यांच्या वतीने आंदोलन सुरू आहे. शासनाने या आंदोलनाची कोणतीच दखल न घेतल्याने आंदोलकांनी अचानकपणे शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता कर्जत मधील टिळक चौकात भर बाजारपेठेत रास्ता रोको केला.

पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम यांनी आम्ही कोणत्याही क्षणी विषप्राशन करणार असल्याचे जाहीर केले. नायब तहसीलदार सचिन राऊत यांनी पेण बँक संदर्भात दरमहा जिल्हाधिकारी दालनात बैठक होईल असे पत्र वरिष्ठांना पाठवत असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन थांबवण्यात आले.यावेळी पोलीस यंत्रणा सुद्धा सज्ज होती.

त्यामुळे पेण बँक संघर्ष समिती आणि पोलीस मित्र संघटना यांच्या वतीने ३० सप्टेंबरपासून कर्जत लोकमान्य टिळक चौक येथे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. शासनाने याकडे गांभीर्याने न घेतल्यास हे आंदोलन चिघळण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण को ऑपरेटिव्ह अर्बन बँक २३ सप्टेंबर २०१० रोजी बंद पडली. त्यामुळे गेल्या १४ वर्षापासून पेण बँकेचे रायगड जिल्ह्यातील सुमारे १,५८,२८० ठेवीदार यांचे ६१० कोटीच्या ठेवी बुडीत निघाल्या. सन २०१० पासुन सन २०२४ पर्यंत प्रत्येक निवडणुकीत अनेक पक्षाच्या सरकारने अनेक पक्षातील नेत्यांनी व अनेक पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी पेण अर्बन बँक ठेवीदारांना ठेवी मिळवुन देण्याची आश्वासने दिली आहेत. मात्र एकाही पक्षाच्या सरकारने व नेत्यांनी व लोकप्रतिनिधींनी आश्वासने पूर्ण केलेली नाहीत.

## प्लास्टीक पिशव्यांचा साठा केला जप्त

**पनवेल :** तळोजा परिसरातून अन्न, औषधे व प्रशासन विभागाच्या पथकाने छापा घालून सव्वा चार लाखाच्या प्लास्टीक पिशव्यांचा साठा जप्त करून व्यापाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

निसार अब्दुल हमीद मुल्ला यांच्याकडे मोठ्या प्रमाणात प्लास्टीक पिशव्यांचा साठा असल्याची माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. अन्न सुरक्षा अधिकारी विक्रम निकम यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने छापा टाकून ३ हजार ४०५ वेगवेगळी प्लास्टीक पिशव्यांची मोठी पाकिटे ताब्यात घेतली.

## गोखले महाविद्यालयात सायबर सुरक्षा व्याख्यान

। श्रीवर्धन । वार्ताहर।

येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात एनएसएस विभाग आणी श्रीवर्धन पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन ठेवण्यात आले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम रकामे तसेच अंशु संस्थेचे निलेश गुंडो या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक होते.

पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांनी व्यासपीठावरून मार्गदर्शन करताना, मसध्या देशात आणी राज्यात जे ऑनलाईन फ्रॉड सर्रासपणे होत आहे त्याची घडणारी अनेक उदाहरणे देऊन कशी काळजी घ्यावी या विषयी विद्यार्थ्यांना सजग केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी अध्यक्षपदावरून बोलताना, प्रत्येक व्यक्तीकडे आता मोबाईल असल्याने बँकींग व्यवहार जपूनच करायला हवेत व तरुणांनी आपल्या पालकांनाही सजग करावे असे आवाहन केले.

# जिल्ह्यातील २०० तरुणांना व्यावसायिक शिक्षण देणार

### फ्लिपकार्ट आणि स्वदेश फाऊंडेशनचा उपक्रम

। रायगड । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील तरुणांचा विकास करण्यासाठी एक उपक्रम तयार केला आहे. रूरल प्रोस्पेरिटी : एम्पॉवरिंग रूरल युथ थ्रू टार्गेटेड स्किल डेव्हलपमेंट फॉर सस्टेनेबल इनकम्स असं या उपक्रमाचं नाव आहे. त्याअंतर्गत २०० तरुणांचा कौशल्यविकास करून त्यांचं जीवनमान उंचावलं जाणार आहे. त्यामुळे या तरुणांच्या घराचं उत्पन्न वर्षाला ८०,००० ने वाढवण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.



१८ ते ३५ वयोगटातील तरुणांना व्यावसायिक प्रशिक्षण दिलं जाणार आहे. ज्यांना इमारतीचं बांधकाम आणि रंगरंगोटी शिकायची आहे त्यांच्यासाठी वयोमर्यादा ४५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या उपक्रमामुळे या भागातील लोकांच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता असून रोजगारक्षमता देखील वाढेल. त्याचा जवळजवळ ६६० कुटुंबीयांना फायदा होणार आहे. त्यामुळे एकूण ८६० जणांना फायदा होणार आहे.

या उपक्रमात काही महत्त्वाच्या संकल्पना अंतर्भूत आहेत- तरुणांना प्रेरणा देणं आणि त्यांचा सहभाग सुनिश्चित करणं, समुपदेशन आणि मूल्यांकन, नोंदणी, प्रशिक्षण, प्रशिक्षणानंतरचे मूल्यांकन आणि झालेल्या रोजगारनिर्मितीचा वेळोवेळी पाठपुरावा करणं. प्रत्येक कौशल्य विकासाची बॅच सुमारे ५५ दिवसांची असणार आहे.

# पोल्ट्री फार्म नोंदणीसाठी पशुसंवर्धनची विशेष मोहीम

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पोल्ट्री फार्म व्यवसायिक आणि उत्पादक यांच्यासाठी नोंदणी प्रक्रियेबाबत शिबीर घेण्यात आले. पशुसंवर्धन विभाग कर्जत यांच्या मार्फत तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय कर्जत येथे कुक्कुट फॉर्मधारक यांच्यासाठी हे मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते.

कुक्कुट पालन-पोल्ट्री फीड-कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग बाबत शासन निर्णय, इतर संबंधित अपडेट होण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार पोल्ट्री व्यावसायिक आणि लघु व्यावसायिक यांच्याकडे कर्जत येथे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. पोल्ट्री उत्पादक आणि पशुपालक यांना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा सहायक आयुक्त पशुसंवर्धन कर्जत डॉ. गिरीश बारडकर, तालुका पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, पशुसंवर्धन विभाग कर्जतचे डॉ. सुवर्णलता मनगुळी, डॉ. आसाराम काळे, सूर्यपंखा पारखे,गणेश निरगुडा आदी अधिकारी वर्ग उपस्थित होता. या विशेष मार्गदर्शन शिबिराच्या माध्यमातून, सहा. आयुक्त पशुसंवर्धन कर्जत डॉ. गिरीश बारडकर यांनी कर्जत तालुक्यातील ३००० कुक्कुट पक्षी पेक्षा जास्त क्षमतेचे सर्व पोल्ट्री फार्म धारक यांना, विहीत नमुन्यातील अर्ज भरून पोल्ट्री फार्म नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन ही केलेले आहे.

या शिबिरात कर्जत तालुक्यातील कुक्कुट पालक, पोल्ट्री फॉर्म धारक दिपक भगत,अनिल शेमटे,विलास मोडक, दाजी पारधी, प्रतिक घरत, हनुमंत पाटील, किरण पाटील तसेच अन्य पोल्ट्री उत्पादक उपस्थित होते. शिबिरात उपस्थित राहिलेल्या पोल्ट्री फॉर्म धारक यांचे पोल्ट्री फार्म नोंदणी प्रक्रिया करीता विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आले.

## दंत तपासणी शिबिराचे आज आयोजन

**माणगाव :** हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, कॉलेज ऑफ सायन्स महाड आणि योगिता दंत महाविद्यालय, खेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात सोमवारी (दि. ०७) मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मोफत दंत तपासणी होणार असून शिबिरात मिळणारे कार्ड योगिता दंत महाविद्यालय, खेड येथे दाखवून पुढील उपचारात सूट मिळवता येणार आहे.



# खारपाडा येथे दंतचिकित्सा शिबीर

। हमरापूर । प्रतिनिधी ।

युवा फ्रेंडस् सर्कल फाउंडेशन खारपाडा आणि स्माईल अँड डेंटल क्लिनिक जोहे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दातांची तपासणी शिबिर संपन्न झाले.

या शिबिराचे आयोजन युवा फ्रेंडस् सर्कल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते कैलास घरत यांनी केले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन डीवाय फाऊंडेशन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष योगेश पाटील यांच्या शुभहस्ते झाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डीवाय फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य सल्लागार प्रकाश केणे, अनंता कोळी, खारपाडा ग्रामपंचायत सरपंच नेत्रा घरत, उपसरपंच घरत, दिनेश म्हात्रे, जिल्हा अध्यक्ष यश घरत, धिरज माळवी, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मनोहर पाटील आदींसह ग्रामस्थ आणि युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या शिबिरासाठी स्माईल अँड शाईन डेंटल क्लिनिकच्या डॉ. चैत्राली कडू, डॉ. श्रध्दा पाटील, आणि डॉ. साहिल थवई, असिस्टंट सिमरन डाऊर इत्यादी तज्ञ डॉक्टरांची टीम आणि विजय रघुनाथ कडू उपस्थित होते. अनेक रुग्णांनीं या शिबिराचा लाभ घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी मितेश पाटील यांचे सहकार्य लाभले. या अनोख्या उपक्रमाबद्दल खारपाडा पंचक्रोशीतील नागरिकांकडून सामाजिक कार्यकर्ते कैलास घरत यांचे कौतुक करण्यात येत आहे.

पान १ वरून

## आमदार निष्क्रिय

असणारा अलिबाग-रोहा रस्ता आता खड्ड्यांमुळे जाम झाला आहे. रस्ता निर्मितीला सुरुवात झाली. तेव्हा श्रेयवादासाठी महायुतीमधील नेत्यांमध्ये झालेली हमरीतुमरी जनतेने अनुभवली आहे. रस्त्याला पडलेल्या खड्ड्यांचे श्रेय घेण्यासाठी मात्र महायुतीचे नेते पुढे येताना दिसत नाही. खानाव ते सुडकोली हा प्रवास अपघाताला निमंत्रण देणारा ठरत आहे. खास करून नांगरवाडी ते भागवाडी मधील खिंडीची अवस्था दयनीय झाली आहे. या खिंडीमध्ये रस्ता उखडला गेल्याने वाहनचालकांना वाहने चालविणे जिकरीचे बनले आहे.

अलिबाग-रोहा मार्गावरील वळवली ते गेल कंपनीपर्यंत रस्त्याच्या एका बाजूकडील काँक्रिटीकरण करण्यात आले. त्याला एक वर्ष होऊनदेखील दुसरी बाजू करण्यास ठेकेदार उदासीन ठरला. दुसऱ्या बाजुला पावसाने चिखल केल्याने त्यावर आता ठेकेदारामार्फत जेएसडब्लू कंपनीमधील रॉ मटेरिअल टाकून खड्डे बूजवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या खडीचे साम्राज्य काँक्रिट रस्त्यावर आल्याने वाहने चालविणे धोकादायक बनू लागले आहे. अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. अलिबागपासून रोहा-साईपर्यंत ८४ किलो मीटरच्या रस्त्यासाठी १५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे ५० टक्के काम झाल्याचा दावा बांधकाम विभागाकडून केला जात आहे. परंतु अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोलीपासून अलिबागपर्यंतच्या रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करून रस्त्यावरील खडी उखडली असल्याने दुचाकी वाहने घसरून अपघात होत असल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. विद्यमान आमदारांनी अनेक वेळा या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केले. परंतु पाच वर्षात हा रस्ता पूर्ण करण्यास अपयशी ठरल्याने या मार्गावरील प्रवासी वर्गाकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्याचे काम संथगतीने सुरु झाल्याने अलिबाग-सुडकोली मार्गावरील प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. अनेकवेळा एसटी बसेसदेखील या रस्त्यावर बिघडत आहेत. विद्यमान आमदारांनी चांगल्या रस्त्याचे स्वप्न दाखविले आहे, ते स्वप्नच राहिल्याची प्रतिक्रीया जनमानसातून उमटत आहे.

## प्रशासकीय राजवटीत अडकले मान'धन'

जास्त आहे, त्या सरपंचाचे मानधन पाच हजार रुपयांवरुन थेट दहा हजार रुपये करण्यात आले आहे. तर उपसरपंचाचे मानधन दोन हजार रुपयांवरुन चार हजार रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मानधनवाढीमुळे राज्य शासनावर वार्षिक ११६ कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार आहे.

रायगड जिल्ह्यात सुमारे ८११ ग्रामपंचायती आहेत. पैकी २४३ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने त्या ठिकाणी प्रशासकीय राजवट सुरु आहे, तर उर्वरित ५६८ ठिकाणी ग्रामीण भागाचा कारभार सरपंच आणि उपसरपंचांच्या हातात आहे. जेथे प्रशासकीय राजवट सुरु आहे, तेथे सरपंच आणि उपसरंपच नाहीत, निवडणुका झाल्यानंतर निवडून येणाऱ्या सरपंच आणि उपसरपंचाना या वाढीव मानधनाचा लाभ मिळू शकतो.

## चेंबूरमध्ये अग्नितांडव

आगीमध्ये एकाच कुटुंबातील ७ जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये ७ वर्षांच्या मुलीचा आणि १० वर्षांच्या मुलाचाही समावेश आहे. पॅरिस गुप्ता (७), मंजू प्रेम गुप्ता (३०), अनिता प्रेम गुप्ता (३९), प्रेम गुप्ता (३०), नरेंद्र गुप्ता (१०), विधी गुप्ता (१५), गितादेवी गुप्ता (६०) अशी मृत व्यक्तींचे नावे आहेत. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. यावेळी घरात अडकलेल्या कुटुंबियांना बाहेर काढत राजावाडी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या दुर्घटनेत दुकानात झोपलेल्या लोकांचा जीव वाचला आहे. नक्की आग कशामुळे लागली, याचा शोध घेत आहोत. या आगीत दोन जणांना कोणतीही दुखापत झालेली नाही. तर ७ जणांचे शवविच्छेदन बाकी आहे, अशी माहिती डीसीपी हेमराजसिंह राजपूत यांनी दिली.या झालेल्या घटनेची चौकशी केली जाईल आणि योग्य तो निर्णय देखील घेण्यात येईल. सरकार या पीडित कुटुंबासोबत असून मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक मयताला पाच लाख रुपये, अशी एकूण ३५ लाखांची मदत शासनाच्या वतीने दिली जाईल. तसेच जे जखमी आहे त्यांचा शासनाच्या वतीने योग्य तो वैद्यकीय उपचार केला जाईल. अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

## ५० विद्यार्थिनींना अन्नातून विषबाधा

देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मोहिते म्हणाले, की रात्रीच्या जेवणानंतर काही विद्यार्थिनींना मळमळ आणि उलट्या होत होत्या. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर आता काही विद्यार्थिनींना वसतीगृहात परत पाठवण्यात आलं आहे. तर काही विद्यार्थिनींवर उपचार सुरू आहेत. सर्व विद्यार्थिनींची प्रकृती आता स्थिर आहे.

याप्रकरणी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.डी. नितनवरे यांनीही प्रतिक्रिया दिली. या घटनेची माहिती मिळताच आम्ही विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल केले होते. तसेच याची माहिती त्यांच्या पालकांना दिली होती. आता सर्व विद्यार्थिनींची प्रकृती स्थिर आहे. काही विद्यार्थिनींना पुन्हा वसतीगृहात पाठवण्यात आलं आहे. तर काहींवर उपचार सुरू आहेत, असे त्यांनी सांगितलं. तसेच याप्रकरणी तपास सुरु करण्यात आला असून अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

## शेकापक्ष गरिबांच्या ह्रदयातील पक्ष

डरकाळी फोडेल. त्यावेळी इथला तरुण, भूमिपुत्र काय आहे ते समजेल, असे प्रीतम म्हात्रे म्हणाले.

कर्नाळा बँकेचे ९६.३३ टक्के लोकांचे पैसे व्याजासहित परत केले आहेत. उरलेले पैसे म्हणजे एकशे दहा कोटी रुपयांची रक्कम परत करायची आहे. ती लवकरात लवकर परत केली जाईल. त्याच्या अगेन्स साहेबांचे ८४० कोटीची प्रॉपर्टी गहाण आहे. मात्र वातावरणे तापविली जातात. साहेब ही रक्कम द्यायला तयार आहेत. परंतु राजकीय हव्यासापोटी ते देऊ नयेत. ते आम्हाला व्याजासहित मिळायला पाहिजे. असे ॲड. ठाकूर यांनी मागणी केली आहे. प्रीतम म्हात्रे यांना आम्हीच उभे केले असे समोरचे सांगतात. प्रीतम म्हात्रे नावाचा दबादबा विरोधकांनी घेतला आहे. अहो शेतकरी कामगार पक्षाचा प्रीतम म्हात्रे एक साधा कार्यकर्ता आहे. त्याचा धसका घेण्याची काहीच गरज नाही. शेतकरी कामगार पक्षाचे गेलेले दिवस परत आणायचे असतील तर सर्वांनी एकजुटीने काम करण्याची गरज आहे. विरोधकांना त्याचा फायदा होता कामा नये, असे असे प्रीतम म्हात्रे म्हणाले.

नोकरीच्या प्रश्नावर बोलताना नोकरीचा प्रश्न या भागात मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. एअरपोर्ट रोजगाराचा विचार केला तर शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम. म्हात्रे संस्थेच्या नावाने कुठल्याही प्रकारचे मानधन न घेता येथील गरजू गरजवंतांना प्रशिक्षण दिले जाते. एअरपोर्ट स्किल प्रमाणे नोकरी दिली जाईल. त्या प्रकारचे सर्टिफिकेट इथल्या तरुणांना मिळावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ४३ जणांना मुंबई एअरपोर्टमध्ये काम दिले गेले आहे. शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता जागा झाला आहे.आपल्याला पद असो नसो शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता रस्त्यावर उतरतो. शेतकरी कामगार पक्षाला महाविकास आघाडीच्या माध्यमातून विधानसभेचे काम करण्याची संधी मिळाली तर कमीत कमी पाच हजार तरूणांना नोकरी देण्याचे आश्वासन मी देत आहे. असेही ते म्हणाले. तसे आम्ही प्रयत्नही सुरू केले आहेत. शेतकरी कामगार पक्ष आणि ज्येष्ठ नेतेमंडळी जो आपल्याला आदेश देतील त्या आदेशाची आपण अंमलबजावणी करायला पाहिजे. तो आदेश आपल्या हिताचा असेल असेही असे प्रीतम म्हात्रे म्हणाले.

यावेळी २०० हून अधिक कार्यकर्त्यांची शेतकरी कामगार पक्षात पदाधिकारी व पदनियक्ती करण्यात आली. तर असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्ष प्रवेश केला. यावेळी व्यासपीठावर शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते जे. एम. म्हात्रे, शेकाप चिटणीस किशोर पाटील, संतोष जंगम, विकास नाईक, सीमा घरत, नामदेव पाटील, नारायण घरत, वामन तांडेल, रमाकांत म्हात्रे, संतोष घरत, माधुरी गोसावी, काका पाटील, नाना मोरे, रमाकांत पाटील, रवी घरत, राम भोईर, सुरेश पाटील, शुभांगी पाटील, नरेश घरत, मयूर सुतार, अतिश भगत आदी मान्यवर उपस्थित होते.

## सरदार पटेल यांचा पुतळा उभा राहिला पण छत्रपतींचा नाही

असलेले आमचे बोर्ड काढून टाकले आहेत. परंतु महायुतीचे बोर्ड तसेच आहेत. आम्ही समुद्रात स्मारकाच्या पाहणीसाठी जाणार आहोत. परंतु ज्या बोटने जाणार आहोत, त्या बोटवाल्यांना भाजपकडून धमक्या दिल्या जात आहेत. त्यांना परवाना रद्द करण्याची धमकी दिली गेली आहे. आम्ही धमक्यांना घाबरणार नाही. जिथेपर्यंत आम्हाला परवानगी आहे तिथे पर्यंतच जाणार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून चूक होत आहे. त्या ठिकाणी परवानग्या नव्हत्या तर मग ते आले का? ८ वर्षांपासून काहीच काम झाले नाही. मोदींनी महाराष्ट्र सरकारला विचारले पाहिजे. माझ्या हस्ते जलपुजन करूनही काहीच काम का केले नाही. राज्यातील जनतेची ही फसवणूक केली आहे. आज आम्ही शिवरायाचा स्मारकाचा मुद्दा घेतला आहे. पण इंदू मिलमधल्या बाबासाहेबांच्या स्मारकाबद्दल पण हीच भूमिका आहे. उदयनराजे आणि मी आम्ही दोन्ही वेगळे घटक आहोत. आमचा पक्ष वेगळा आहे. ते त्यांची बाजू मांडतात मी माझी बाजू मांडत आहे. मी वेळोवेळी स्मारकाबाबत भूमिका मांडली आहे. मुंबई मनपाची निवडणूक असताना भाजपाने जलपुजन करून तेव्हा राजकारण केले होते, असा आरोप संभाजीराजे यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अरबी समुद्रात जलपूजन केलेल्या शिवस्मारकाचा शोध घेण्यासाठी संभाजीराजे छत्रपती हे रविवारी स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांसह मुंबईत धडकले. संभाजीराजे गेट वे ऑफ इंडियाच्या परिसरातून बोटीने मोदींनी जलपूजन केलेल्या शिवस्मारकाच्या ठिकाणी जाणार होते. मात्र, पोलिसांनी याठिकाणी संभाजीराजे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना अडवून धरल्याने एकच गोंधळ पाहायला मिळाला. यावेळी महाराष्ट्र स्वराज्य संघटनेचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये काहीशी झटापट झाली. पोलीस महाराष्ट्र स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांना गाडीत डांबून ठाण्यात नेत होते. त्यावेळी संभाजीराजे छत्रपती यांनी आक्रमक होत हस्तक्षेप केला.

## पुणे पुन्हा हादरले; महिलेवर अत्याचार

घेतली आणि थेट वारजे पोलीस स्टेशन गाठले. यानंतर पीडितेच्या तक्रारीवरुन वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दरम्यान वारजे माळवाडीतच दोन दिवसांपूर्वी पोलिसांनी एका ३५ वर्षीय व्यक्तीला त्याच्या ११ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, मुलगी शिकत असलेल्या शाळेतील शिक्षकांना अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची माहिती मिळाल्यानंतर ही घटना उघडकीस आली.शाळेच्या मुख्याध्यापकांनी पोलिसांशी संपर्क साधला आणि भारतीय न्याय संहिता तसेच लैंगिक अपराधांपासून मुलांचे संरक्षण कायद्यांतर्गत वडिलांविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला.

पुण्यात गेल्या चार दिवसांत महिला आणि मुलींवरील अत्याचाराच्या चार घटना समोर आल्या आहेत. आधी शाळेच्या बस चालकाने एक मुलीवर बसमध्ये अत्याचार केला होता. त्यानंतर बोपदेव घाटात रात्रीच्या वेळी तीन ते चार जणांच्या टोळीने मित्राबरोबर फिरायला गेलेल्या मुलीला शिकार केले. आणि आता ही घटना समोर आली आहे.




दिनांक : ०९-०९-२०२४
प्रथम क्रमांक - पांडुरंग विष्णू घरत, लोणारे
द्वितीय क्रमांक - आर्य सत्यप्रसाद आढाव, चणेरा

दिनांक : १०-०९-२०२४
प्रथम क्रमांक - रोशन दत्ताराम चव्हाण, महाड
द्वितीय क्रमांक - सुदेश समेळ, चोंढी

दिनांक : ११-०९-२०२४
प्रथम क्रमांक - सागर म्हात्रे, थळ-पारोडा
द्वितीय क्रमांक - रोशन म्हसळकर, पनवेल

दिनांक : १२-०९-२०२४
प्रथम क्रमांक - मिलिंद परशुराम घरत, दिवी पारंगी
द्वितीय क्रमांक - विक्रम विजय नाईक, कार्ले खंडाळे

दिनांक : १३-०९-२०२४
प्रथम क्रमांक - संदीप राऊत, गौळवाडी-अलिबाग
द्वितीय क्रमांक - सचिन माळी, तुडाळ

दिनांक : १४-०९-२०२४
प्रथम क्रमांक - तेजस मधुकर घरत, तुर्भे गाव, नवी मुंबई
द्वितीय क्रमांक - अनिकेत अनंत म्हात्रे, चौलमळा

दिनांक- १५-०९-२०२४
प्रथम क्रमांक - जगन्नाथ बाळकृष्ण घरत, खंडाळे
द्वितीय क्रमांक - उदय रामदास घरत, वरसोली-अलिबाग

दिनांक - १६-०९-२०२४
प्रथम क्रमांक - प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी
द्वितीय क्रमांक - वसंत धर्मा घरत, वरसोली

दिनांक - १७-०९-२०२४
प्रथम क्रमांक - रमेश बा. धुमाळ, नांगरवाडी
द्वितीय क्रमांक - अक्षय अशोक पाटील, शिहू

विजेत्यांनी आपले बक्षीस ३ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत दु. १२ ते सायं. ५ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.
टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.
पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

# विकासातील अडसर दूर करा

## माथेरान ग्रामस्थांची शासनाकडे मागणी

**। माथेरान । वार्ताहर ।**

**माथेरान या पर्यटनस्थळाला २००३ मध्ये इको सेन्सेटिव्ह झोन लागू केल्यापासून आवश्यक असणाऱ्या महत्त्वाकांक्षी विकासकामांना परवानगी घेण्यासाठी शासनाने नेमलेल्या सनियंत्रण समितीच्या परवानगीशिवाय आणि त्यांच्या जाचक अटींमुळे काहीही करता येत नाही. त्यामुळे एकप्रकारे माथेरानच्या विकासाला जे काही अडसर निर्माण होत आहेत, ते शासनाने दूर करावेत, अशी मागणी होत आहे.**

हेरिटेज वास्तूंच्या डागडुजी असोत किंवा रहदारीच्या दगड मातीच्या रस्त्यांचा प्रश्न असो, या सनियंत्रण आणि हेरिटेज समितीच्या परवानगीशिवाय कामे पूर्ण करता येत नाहीत. इको सेन्सेटिव्ह झोन लागू असल्याने सनियंत्रण समितीचे पदाधिकारी मुळात इथे वास्तव्यास नसताना या गावाविषयी त्यांनाच अधिक प्रेम असल्याचा आविर्भाव आणून विकासकामांना आडकाठी आणली जात आहे. यामुळेच येथील रस्त्यांची अद्यापही दुरुस्ती होऊ शकलेली नाही. यातच या गावात पूर्वीपासून विकासाला विरोध करणारी मंडळी आजही कार्यरत असल्याने लहान सहान बाबींची इत्यंभूत माहिती खबऱ्यांप्रमाणे नियमितपणे सनियंत्रण समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिली जाते, असेही बोलले जात आहे.



एकीकडे जग एकविसाव्या शतकात वाटचाल करीत असताना याठिकाणी जुन्याच विचारांना, व्यवसायांना स्थान देण्यात धन्यता मानणाऱ्या लोकांमुळे हे गाव प्रगतीपथावर जाऊ शकलेले नाही. मुळात, ज्या गावातील रस्ते सुस्थितीत नाहीत, त्या गावाचा विकास कदापी होऊ शकत नाही. हे जरी त्रिवार सत्य असले, तरीसुध्दा आजच्या कमाईवरच खुश होऊन भविष्याची आपल्या भावी पिढीची चिंता नसणाऱ्या इथल्या काही मंडळींमुळे या गावाचा विकास होण्यास विलंब लागत आहे. आगामी काळात पर्यटकांना ने-आण करण्यासाठी ई-रिक्षा सर्वत्र सेवा उपलब्ध करुन देणार आहेत, त्यासाठी आवश्यक ठिकाणी उत्तम दर्जाचे क्ले पेव्हर ब्लॉकच्या रस्त्यांशिवाय पर्याय उरलेला नाही.

# शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचा सत्कार

**। वायशेत । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग या बँकेची ३० सप्टेंबर १९६० साली स्थापना झाली. तेव्हापासून दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील मंगळवारी (दि.१) धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यानिमित्त महाड येथील दत्त प्रा. देशमुख-कांबळे भजन मंडळाचे बुवा सुजित देशमुख व मृदंग अजित देशमुख यांच्या भजनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून सुजित देशमुख यांच्या हस्ते आरडीसीसी बँकेचे अध्यक्ष मा. आ. जयंत पाटील यांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी बँकेचे वरीष्ठ अधिकारी वाघमोडे, भगत, नांदगांवकर, पी. के. पाटील, पडवळ, म्हात्रे, देशमुख, संतोष पाटील तसेच महिला कर्मचारी, काशिनाथ भावजी, रमाकांत म्हात्रे, अरविंद पडते, सारंग यांनी विशेष मेहनत घेतली.





● निळाशार आकाशात सुर्यास्ताच्या वेळेला मनाला मोहिनी घालणाऱ्या सोनेरी किरणांची उधळण. अशा निसर्ग संपन्न वातावरणात दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर घोडागाडीतून रपेट मारताना पर्यटक. ( छाया: अमेय नाझरे )

# संतप्त शिक्षकांचे अर्धनग्न आंदोलन

## आझाद मैदानावर सरकारच्या नावाने बोंबा

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

शिक्षक समन्वय संघाच्यावतीने १६ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर शिक्षकांच्या प्रमुख मागण्यांसाठी हुंकार आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून भर ऊन व पावसात हजारो शिक्षक आझाद मैदानात तग धरून बसले होते. गुरुवारी संतप्त शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी अर्धनग्न आंदोलन केले. यावेळी सरकारच्या नावाने बोंबादेखील मारण्यात आल्या. या आंदोलनात हजारोंच्या संख्येने शिक्षक येथे उपस्थित होते.



या आंदोलनाची दखल घेऊन राज्य सरकारने २७ सप्टेंबर रोजी घेतलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सर्व मागण्या मान्य करून शासन निर्णय काढला जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, सरकार वेळकाढूपणा करत आहे, असा आरोप आंदोलनकर्त्या शिक्षकांकडून करण्यात येत आहे.

नुकतीच मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक झाली. मात्र, या कॅबिनेट बैठकीत अंशतः अनुदानित शिक्षकांच्या अनुदानाचा विषय घेतला नाही. या शासनाच्या वेळकाढूपणामुळे आझाद मैदानात सनदशीर मार्गाने आंदोलन करत असलेल्या शिक्षकांच्या पदरी निराशा आली. मात्र, आता सरकारने समन्वय संघावर वेगळा विचार करण्याची वेळ आणू नका, हा समन्वय संघाच्यावतीने सूचनावजा इशारा देण्यात आले आहे.

# माथेरानमध्ये अवैध धंदे तेजीत

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये मागील काही वर्षांपासून अवैध धंदे तेजीत दिसत आहेत. याबाबत कुणाच्याही तक्रारी येत नसल्याने मटका आणि ऑनलाइन रेसेस खेळण्यासाठी युवावर्गाची झुंबड पडत आहे. यामध्ये नियमितपणे लाखो रुपयांची उलाढाल होत असते. यामुळे हे जुगार खेळण्यासाठी अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत.

तर, काही जणांनी गावातील काही सावकारांकडून दहा टक्के व्याजाने पैसे काढून या जुगारात लावले होते. हा कर्जाचा अवाढव्य डोंगर फेडता येत नसल्यामुळे काहीजण गाव सोडून सुद्धा गेले होते. शेवटी त्यांना मित्र मंडळींनी आधार देऊन माघारी आणल्याचे बोलले जात आहे. गावाच्या वस्तीच्या ठिकाणी हे अवैध धंदे जोमाने सुरू आहेत.

# ‘दारिद्र्यरेषेखालील सर्व्हे होणे गरजेचे’

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

ज्यांचे वार्षिक उत्पन्न खूपच कमी आहे, त्यांना दारिद्र्यरेषेत नमूद करून त्याप्रमाणे पिवळे रेशन कार्ड दिले जाते. तसेच, शासनाच्या अनेक योजनेचा लाभ त्यांना मिळतो. मात्र, यापूर्वी सन २००५ मध्ये सर्व्हे झाले असताना त्यानंतर आजतागायत २० वर्षे होण्यास आली तरी नव्याने सर्व्हे केला नसल्याने कर्जत तालुक्यातील व शहरातील अनेक कुटुंबं दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी म्हणून वंचित राहिली आहेत. तरी, तात्काळ नव्याने सर्व्हे करून गोरगरीब कुटुंबाला न्याय द्या. निवडणुकीच्या अगोदर म्हणजे दर पाच वर्षांनी दारिद्र्यरेषेखालील सर्व्हे होणे अपेक्षित आहे. यातील लाभार्थींची संख्या वाढली की घटली तसेच नवीन यादी तयार करणे, त्यात नावे समाविष्ट करणे, हे महत्त्वाचे काम २००५ नंतर कर्जत तालुक्यात झाले नाही. शासनाच्या या गलथान कारभाराविरोधात तीव्र आंदोलन छेडून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अमोघ कुळकर्णी यांनी कर्जत तहसील कार्यालयाचे पुरवठा विभागाचे अधिकारी रवींद्र दळवी यांना निवेदन देऊन दिला आहे.





# विश्वगुरुंच्या येरझारा

नरेंद्र मोदी गेल्या महिन्याभरात तिसऱ्यांदा महाराष्ट्रात येऊन गेले. शनिवारी वाशीमला पोहरादेवी आणि ठाण्यात मेट्रो वगैरेंचे कार्यक्रम त्यांनी केले. तिकडे हरियाणामध्ये मोदींचे नाव चालेनासे झाले. त्यांच्या फारशा सभाच झाल्या नाहीत. भाजपचा तेथे पराभव होईल असे सर्वजण म्हणतात. शनिवारी मतदानानंतर जे सर्वेक्षणांचे अंदाज आले आहेत त्यानुसार ९० जागांच्या विधानसभेत काँग्रेसला ५० ते ६० जागा मिळतील असे दिसते. भाजपच्या जागा निम्म्याने कामी होणार आहेत. तेथे मोदींना प्रचारात काही किंमत नव्हती. भरोसा दिल से भाजप फिरसे अशी भाजपची घोषणा होती. डबल इंजिन सरकार, मोदी की गॅरंटी वगैरेंची हवा होऊन गेली. काश्मीरमध्येही भाजपला सत्ता मिळण्याची शक्यता कमी आहे. तेथेही मोदींनी जेमतेमच प्रचार केला. महाराष्ट्र गमावणे त्यांना परवडणारे नाही. गेल्या दहा वर्षात इथले सगळे उद्योग गुजरातला पळवून नेले आहेत. मुंबईचे महत्व कमी करून अहमदाबादला वित्तीय केंद्र हलवण्याचे चालू आहे. गिफ्ट सिटी नावाचा प्रकल्प त्यासाठी आहे. तेथे कार्यालय काढणाऱ्या परदेशी वित्तीय संस्था, बँका यांना प्रचंड सवलती देण्यात आल्या आहेत. असे होऊनही महाराष्ट्राची प्रगती रोखता येत नाही. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणे अशक्य आहे. आता हिंदी प्रदेशातही दणके बसू लागले. उत्तर प्रदेशात लोकसभेला भाजपपेक्षा समाजवादी पक्षाला अधिक जागा मिळाल्या. झारखंड आणि दिल्लीमध्ये यश मिळण्याची खात्री नाही. झारखंडात हेमंत सोरेन तर दिल्लीत अरविंद केजरीवाल या दोन्ही मुख्यमंत्र्यांना खोट्या केसेसमध्ये अडकवण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून ही बाब भाजपवर चांगलीच उलटणार आहे. या दोन्ही राज्यांच्या निवडणुका येत्या सहा महिन्यात होणार आहेत. आता निदान, महाराष्ट्र तरी हातातून सुटू नये म्हणून विश्वगुरूंच्या महाराष्ट्रात येरझारा चालू आहेत. येथे यायचे आणि महाविकास आघाडीवर वाटेल ती टीका करायची हा त्यांचा नित्यक्रम आहे. तो त्यांनी शनिवारीदेखील पार पाडला.

### पाण्याची गळती

मध्यंतरी मोदी पुण्यात येऊन मेट्रोच्या एका मार्गाचे उद्घाटन करणार होते. वास्तविक पुण्याच्या मेट्रो सेवेचा यापूर्वी मोदींच्या हस्तेच प्रारंभ झाला होता. पण मोदींना प्रसिध्दीसाठी काहीही निमित्ते चालतात. हे म्हणजे मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेचे एकदा उद्घाटन झाल्यानंतर पुन्हा एखादी नवी लेन वाढवली तिच्या उद्घाटनाचा जंगी कार्यक्रम करण्यासारखे होते. पण मोदी आणि त्यांचे मूर्ख भक्त इव्हेंटबाजी आणि प्रसिध्दीसाठी कायमच सज्ज असतात. हे सर्व सरकारी म्हणजे जनतेच्या पैशाने चालू आहे. मोदींच्या एकेक कार्यक्रमावर लक्षावधी रुपयांचा चुराडा होत असतो. सतत पाऊस पडत असूनही त्यांचा पुण्यातला कार्यक्रम शेवटच्या क्षणापर्यंत रद्द करण्यात आला नाही. त्यामुळे चिखलाने भरलेल्या मैदानात खडी, माती टाकून ते सारखे करण्यासाठी शेकडो लोकांचे तास, श्रम इत्यादी वाया गेले. पैसाही गेला. मालवणमध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे असेच घाईघाईने उद्घाटन करण्यात आले होते. त्यासाठी तीन तीन हेलिपॅड बनवण्यात आली होती. त्यांचाच खर्च सुमारे अडीच कोटी झाला. पुतळ्याचा खर्चही त्यापेक्षा कमी आला. शिवाय अशा कमी खर्चात आणि बोगस मटेरियलसह बनवलेला पुतळा कोसळला. मोदींच्या दृष्टीने एक इव्हेंट पार पडला. सिंधुदुर्गासाठी लोकसभेचा प्रचार झाला. आता एकदा दरडावून बोलल्यासारखे करीत माफी मागून झाली. विषय संपला. मोदी पुन्हा पुढच्या इव्हेंटसाठी महाराष्ट्रात यायला मोकळे. काल ते वाशीमला बंजारा समाजाच्या कार्यक्रमासाठी आले होते. जवळच्याच यवतमाळच्या पाणीपुरवठा योजनेचा उद्घाटन समारंभ परवाच्या दोन ऑक्टोबरला ऑनलाईनद्वारे त्यांच्या हस्ते झाला. पण या योजनेचे काम नीट झालेले नाही. २०१७ मध्ये ३०२ कोटी रुपयांची अमृत पाणी योजना आखण्यात आली. ती वेळेत पूर्ण झाली नाहीच. शिवाय यामध्ये टाकण्यात आलेली पाईपलाईन जागोजागी गळते. पंप वगैरेही खराब आहेत. त्यामुळे यवतमाळसारख्या जिल्ह्याच्या शहराला सहा ते आठ दिवसाआड एकदा पाणी मिळते आहे. २०१७ पूर्वी शहराला तीन दिवसातून एकदा पाणी मिळे. तेच बरे होते असे नागरिकांना वाटते आहे.

### भपकेबाज खोटारडेपणा

पुढचे पाठ, मागचे सपाट असा हा सगळा सपाटा आहे. हजारो कोटींचे आकडे लोकांच्या तोंडावर फेकायचे, मोदींनी वेगवेगळे ड्रेस घालून यायचे, जोरात भाषणे ठोकायची, सगळ्या टीव्हीवाल्यांनी त्यांची लाईव्ह प्रसारणे करायची, एक दिवस आधी आणि नंतर त्यांच्या दौऱ्याच्या चर्चा करायच्या आणि सगळा मिळून एक माहोल तयार करायचा असे हे सर्व उपद्व्याप आहेत. हेच सर्व करूनही लोकसभेला अनेक राज्यांतील लोकांनी दाद दिली नाही. भाजपचा दणकावून पराभव केला. तरीही मोदींच्या प्रसिध्दी करणाऱ्यांची अक्कल ठिकाणावर येत नाही. कारण, यांना भपकेबाजपणा करून आणि खोटे बोलूनच यश मिळवण्याची सवय झाली आहे. २०१४ ला नवी नवलाई होती. २०१९ ला पाकिस्तानवर स्ट्राईक केल्याचा खोटा प्रचार करण्यात आला. जनता त्याला भुलली. २०२४ मध्ये ही कल्हई उडाली. ती आणखी उडू नये यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करणे चालले आहे. लाडकी बहीण योजना हे त्याचेच उदाहरण आहे. शिवाय, रस्ते, पूल मेट्रो यांचा धडाका लावण्यात आला आहे. त्यांची खरी गरज किती आहे यांचा विचार केला जात नाही. नागपूरमध्ये मेट्रो, उड्डाणपुलांच्या कामांमुळे दर पावसाळ्यात हमखास पूर येऊ लागला आहे. पुण्यातही हेच घडते आहे. मुंबईतील बांधकामे हा तर चिंतेचा विषय आहे. काही वर्षांनी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि मिठागरांच्या जमिनी पूर्णपणे नष्ट होतील अशी लक्षणे आहेत. थोडक्यात निवडणुका जिंकण्यासाठी पुढच्या चार पिढ्यांचे भवितव्य ही मंडळी धोक्यात आणत आहेत. मुंबईतील मेट्रो प्रकल्पाची कारशेड आरेमध्ये करण्याला उध्दव ठाकरे सरकारचा विरोध होता. पण त्याला पर्यावरणाची कारणे होती. तिच्याकडे डोळेझाक करून हे विकास-विरोधी असल्याचे बेलगाम आरोप पंतप्रधान करतात हे लाजिरवाणे आहे. वाईट म्हणजे निवडणूक होईपर्यंत खोटारडेपणा, दांभिकपणा आणि करोडोंच्या उधळपट्टीची ही नाटके महाराष्ट्राला किमान आणखी एक महिना तरी सहन करावी लागणार आहेत.

विचार

# ड्रॅगनची माघार संशयास्पद

***भारत आणि चीनमधील वाटाघाटी यशस्वी होत असल्याचे वृत्त अलिकडेच पुढे आले. न्यूयॉर्कमध्ये तसेच चीनमधूनही सीमेवर चीन माघार घेत असल्याचे सांगण्यात आले. मात्र गलवान खोऱ्यातून चीन माघार घेत असल्याचे सांगितले जात असले, तरी वस्तुस्थिती तशी नाही. दहा पावले पुढे येणे आणि दोन पावले मागे जाणे म्हणजे माघार नव्हे. चीनवर विश्वास ठेवणे धोकादायक असल्याने आपल्याला दूरगामी नीती अवलंबावी लागेल.***



**ले. ज. दत्तात्रय शेकटकर**

गेल्या काही दिवसांपासून भारत आणि चीनमधील वाटाघाटी यशस्वी होत असल्याचे सांगितले जाते. न्यूयॉर्कमध्ये तसेच चीनमधूनही सीमेवर चीन माघार घेत असल्याचे सांगण्यात आले. भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनीही तसेच सांगितले; परंतु चीनवर विश्वास ठेवणे धोकादायक आहे. चीन हा जगातला सर्वात मोठा विश्वसघातकी देश आहे. चीनच्या सीमा १४ देशांशी लागून असून सर्वच देशांशी त्याचा सीमावाद आहे. चीन काही जमीन बळकावतो, अतिक्रमण करतो, तेव्हा ते माघार घेण्यासाठी नसते, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. भारतीय राजकारणी, परराष्ट्र मंत्रालय आणि आपल्या लष्करानेही चीनचा पूर्वानुभव लक्षात घेऊन तशी धोरणे आखली पाहिजेत. भारत आणि चीनमध्ये १९६२ मध्ये युद्ध झाले. तेव्हापासून चीनचा वारंवार आलेला अनुभव लक्षात घेतला, तर चीन सातत्याने खोटे बोलतो, याची प्रचिती आली आहे. चीनने भारताच्या मोठ्या भागावर कब्जा केला आहे. चार वर्षांपूर्वी चीनने गलवान खोऱ्यात घुसखोरी केली. मोठी चकमक झाली. भारतीय सैन्याने तीव्र प्रतिकार केल्यामुळे आणि त्यात मोठ्या प्रमाणात सैनिक ठार झाल्याने चीनने काहीशी माघार घेतली. याचा अर्थ त्यांनी या भागावरचा कब्जा सोडला, असा नाही. चीनने गलवान खोऱ्यातून माघार घेतली, असे आता जे सांगितले जात आहे, त्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. चीन गलवान खोऱ्यात कशासाठी आला, या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय आपल्याला या प्रश्नाच्या मुळापर्यंत जाता येत नाही. गलवान खोऱ्यात भारताने तीव्र प्रतिकार केला नसता, तर कदाचित चीन या परिसरात मुसंडी मारून हा भाग गिळंकृत केला असता. त्यामुळे पाकिस्तानला जाण्याचा त्याचा मार्ग आणखी मोकळा झाला असता.

चीन काराकोरम खिंडीतून उत्तर भारतात 'चीन पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' (सीईपीसी) बांधत आहे. काराकोरम खिंडीजवळून हा मार्ग जातो. या मार्गावर भारत कब्जा करू शकतो, अशी भीती चीनला सातत्याने वाटते आहे. त्यामुळेच चीनने गलवान खोऱ्यात चकमक घडून आणली. सियाचीन ग्लेशियर हा भाग भारताप्रमाणेच पाकिस्तानसाठीही महत्त्वाचा आहे. गलवानच्या जागेवर भारताने तीव्र प्रतिक्रिया दिल्यामुळे चीन थोडा मागे जाऊन थांबला. गेली चार वर्षे आपण चीनबरोबर वाटाघाटी करत आहोत. बैठका घेत आहोत; परंतु अजूनही चीनने माघार घेतलेली नाही. आता चीन मागे जायला तयार असल्याचे सांगितले जात असले तरी तो कुठपर्यंत मागे जाणार हे तपासून पाहिले पाहिजे. गलवान खोऱ्यात आक्रमण करण्यापूर्वी चीन ज्या ठिकाणी होता, तिथे परत जाणार का, या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय चीनच्या माघारीचे इंगित आपल्याला समजू शकणार नाही. युद्धशास्त्राचे काही नियम आहेत. त्यात राजनीती, कुटनीती, रणनीती या तीनही नीतींनी आपल्याला काम करणे आवश्यक आहे. सध्या भारत आणि चीनमध्ये चालू असलेल्या वाटाघाटींबद्दल इकडचे आणि तिकडचे काही लोक ज्या पद्धतीने बोलत आहेत, त्यावर विश्वास ठेवला तर ती आपली आत्महत्या ठरेल. भारत आणि चीनमधील काही लोक कधीही सत्य बोलत नाहीत.

भारत आणि चीनदरम्यानचा सीमावाद सोडवण्यासाठी नेमलेल्या समितीवर मी दहा वर्षे काम केले आहे. चीनच्या सीमेवर प्रत्यक्ष काम केले आहे. कारगील आक्रमणाच्या वेळी तिथे काम केले आहे. त्या वेळी भारताशी वाटाघाटी करणाऱ्या चीनच्या प्रमुख नेत्यांशी माझी चर्चा झाली. नंतर हा नेता चीनचा परराष्ट्रमंत्री झाला. त्या वेळी त्यांनी म्हटले होते की तुम्हाला सीमावाद मिटवण्याची एवढी घाई का आहे? याचा अर्थच चीनला सीमा प्रश्न सोडवायचा नाही, असा होतो. आता चीन मागे जाणार असल्याचे सांगितले जात असले, तरी तो मागे जाऊन जाऊन जाणार कुठे हे तपासले पाहिजे. तीन-चार किलोमीटर मागे जाऊन पुन्हा पुढे येण्याची तयारी तर तो करत नाही ना, यावर लक्ष ठेवले पाहिजे. चीनने गलवान खोऱ्यात आक्रमण केले, तेव्हा सध्याचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह हेच संरक्षण मंत्री होते. त्यांनी त्या वेळच्या लष्करप्रमुखांना बोलवून चुशूल पर्वतावर आपले सैन्य ठेवून रिझान या जागेवर कब्जा करा, असे सांगितले. भारतीय सैन्याने संरक्षणाच्या आदेशाप्रमाणे या भागाचा कब्जा केला, तेव्हा चीनचे सैन्य सामान सोडून पळाले होते. यातून आपण एक धडा घेतला पाहिजे. तो म्हणजे चीनशी सामना करायचा असेल, तर अशा जागेवर आपला कब्जा असायला हवा, ज्यामुळे आपल्याला चीनचा धोका वाढणार नाही; परंतु दुर्भाग्याने आपण ते करू शकलो नाही. आपण नुसत्या वार्तालापामध्ये रममाण झालो आहोत.

चीन परतीबद्दल वारंवार सांगत असला, तरी तो किती मागे गेला हे कुणी पाहिले आहे का? या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. गलवान खोऱ्यात आक्रमण करण्यापूर्वी चीन नेमका कुठे होता आणि सध्या कुठे आहे आणि माघार घेतल्यानंतर तो कुठे असेल या प्रश्नांची उत्तरे शोधली तरच आपल्याला चीनच्या माघारीचा अर्थ उमगू शकेल. म्हणूनच आजघडीला तरी चीन मागे गेला, या म्हणण्याला सध्या तरी तसा काही अर्थ नाही आणि त्याची कथने वस्तुस्थितीला धरून नाहीत. चीन हा विश्वास ठेवण्याच्या लायकीचा देश नाही. चीनला १४ राष्ट्रांच्या सीमा लागून आहेत. त्यापैकी एकही राष्ट्र असे नाही, ज्याचे चीनशी वाद नाहीत. मांचुरिया, मंगोलिया, तैवान, हाँगकाँग अशा राष्ट्रांची उदाहरणे घेतली, तर आपल्याला चीनची आक्रमक वृत्ती आणि त्यांनी अन्य ठिकाणी बळकवलेली जमीन याची खात्री पटू शकेल. हीच स्थिती भारताबाबतही आहे. भारत शक्तीशाली होऊन दोन हात करणार नाही, तोपर्यंत चीन माघार घेणार नाही हे वास्तव आहे. टेबलावरच्या वाटाघाटी या केवळ वेळ काढण्यासाठी आहेत. त्यातून प्रत्यक्षात हाती काही लागत नाही. जिथे बर्फ पडतो आणि उणे तीस अंशापेक्षा जास्त थंडी असते, तिथे आपले सैन्य लढत असते आणि आपण इकडे वातानुकूलित दालनात बसून चीनच्या माघारीची चर्चा करत असतो. यातला फरक लक्षात घेतला पाहिजे. गेल्या चार वर्षात चीनने भारताच्या भूमीलगत भूमिगत लष्करी तळ, हवाई अड्डे बनवले आहेत. हे काही माघार घेण्यासाठी आहेत का, याचे उत्तर 'नाही' असे आहे. त्यामुळे भारताने गाफील राहून चालणार नाही.

गेल्या ६५ वर्षांचा अनुभव लक्षात घेता चीनची वेळकाढू धोरणे आपल्याला माहित आहेत. त्यामुळे परराष्ट्र मंत्रालय, सैन्यदल यांनी गाफील राहता कामा नये. रशिया हा चीनचा अतिशय जवळचा मित्र असतानाही त्याची पाच हजार आठशे वर्ग किलोमीटर जमीन चीनच्या ताब्यात आहे, तर भारताची ३२ हजार वर्ग किलोमीटर जमीन चीनने गिळंकृत केली आहे. उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश येथिल सीमांवर चीनने घुसखोरी केली आहे. भारताच्या उत्तर सीमेवर कब्जा केला आहे. नेपाळच्या सीमेवर चीन आला आहे. तिथेही अतिक्रमण सुरू आहे. भूतान हे भारताचे मित्र राष्ट्र आहे. त्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे. मात्र तिथेही चीनने घुसखोरी करून भारतावर दबाव टाकायला सुरुवात केली आहे. डोकलाम हे त्याचे उदाहरण. पाकिस्तानबरोबर संबंध नीट ठेवा, अशी एक प्रकारची धमकी चीन आपल्याला देत आहे. पाकिस्तानबरोबर आपले संबंध नीट राहणार नाहीत हे जगजाहीर आहे. बलुचिस्तानमध्ये चीनने ग्वादर बंदर उभारले आहे. तिथून चीनची मोठ्या प्रमाणात आयात निर्यात होते. काराकोरम आणि गलवान ताब्यात घेतले तर पाकिस्तानला जाण्याचा मार्ग आणखी मोकळा होईल, असे चीनला वाटते. त्यामुळे चीन कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही. परिणामी, आपण चीनशी दोन हात करण्याची तयारी कायम ठेवली पाहिजे. 'चीन रिस्पेक्ट पॉवर' अशा अर्थाची एक म्हण आहे. या म्हणीचा अर्थ लक्षात घेऊन चीन शक्तीशाली राष्ट्रांचाच आदर करतो, असे गृहीत धरून आपण आपण आपली दूरगामी नीती अवलंबली पाहिजे. चोख आणि मुत्सद्दी पावले उचलूनच आपण चीनला उत्तर देऊ शकतो.

आजकाल

# अभिजात दर्जा आणि भाजपाचे राजकारण...

**तुषार गायकवाड**

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचे अधिकार केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयास आहेत. महाराष्ट्रात विधानसभा निवडणूका होऊ घातलेल्या आहेत. निवडणूकीच्या तोंडावर मराठी मतदाराला खुष करण्याचा हा प्रयत्न आहे. यामागे भाजपाचा हेतू केवळ मतांचे राजकारण इतकाच आहे.

वास्तविक मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी ठोस संशोधन होवून तसे पुरावे केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयास सादर होणे आवश्यक होते. हा मुद्दा अतिशय दुर्लक्षित होता. आघाडी सरकारच्या काळात पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना सन २०१२ मध्ये सर्वप्रथम मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळावा याबद्दल संशोधन करणेसाठी प्रा. रंगनाथ पठारे समिती गठीत केली गेली.

या समितीचे अध्यक्षपद पठारे यांच्याकडे गेले तेव्हा अनेक सनातनी बृम्हवृंदांनी पृथ्वीराज चव्हाणांवर तोंडसुख घेतले. कारण, रंगनाथ पठारे हे जवळे या नगर जिल्ह्यातील, पारनेर तालुक्यातील कुणबी कुटुंबातील प्राध्यापक व साहित्यिक. मराठीच्या अभिजातपणाचे कार्य कुणब्याच्या हातून व्हावे हे सनातन्यांना मान्य नव्हते. 'सातपाटील कुलवृत्तांत' सारखी कादंबरी लिहीणारा साहित्यिक सनातन्यांना न पचणारा.

याशिवाय या समितीत, दिवंगत प्रा. हरी नरके हे नावही सनातन्यांना न आवडणारे. नरके सरांसह या समितीत डॉ. नागनाथ कोतापल्ले, डॉ. श्रीकांत बहुलकर, प्रा. मधुकर वाकोडे, सतिश काळसेकर, डॉ. कल्याण काळे, प्रा.आनंद उबाळे, डॉ. मैत्रेयी देशपांडे, परशुराम पाटील अशा दिग्गजांचा समावेश होता. या समितीने मराठी भाषेच्या अभिजात दर्जाच्या निकषांची पूर्तता करुन १२९ पानांचा अहवाल २०१३ मध्ये सादर केला.

या अहवालाच्या आधारे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयास ११ जुलै २०१४ रोजी प्रस्ताव दिला. मात्र तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसने सप्टेंबर २०१४ मध्ये काँग्रेसचा पाठींबा काढून घेतला. त्यामुळे अल्पमतात आलेल्या पृथ्वीराज चव्हाणांनी राजीनामा दिला. आणि मराठीच्या अभिजात दर्जाचा मुद्दा खोळंबला.

त्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये रंगनाथ पठारे यांनी टिव्ही ९ मराठीला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले की, ''मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवून ८ वर्षे झालीत. या काळात साहित्य अकादमीच्या समितीनेही मराठीला अभिजात दर्जा देण्याची शिफारस केलीय. मात्र, औपचारिकता शिल्लक असतानाही केंद्र सरकारकडून निर्णय घेतला जात नाही. मराठीच्या अभिजात दर्जाविषयी मोदी सरकारचा मंत्री सरळसरळ खोटं बोलतो.

मोदी सरकारनं दुसऱ्या एका भाषेचा खटला सुरू असल्याचे कारण दिले. पण प्रत्यक्षात केंद्राच्या सांस्कृतिक खात्यानं तो प्रस्ताव साहित्य अकादमीला परत पाठवला. मोदी सरकार म्हणतंय, दुसऱ्या एखाद्या भाषेचा प्रस्ताव आला, तर त्याच्यासोबत मराठीचा प्रस्ताव आमच्याकडे पाठवा.''

रंगनाथ पठारे यांच्या या मुलाखतीमुळे केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकार यांचा खोटारडेपणा उघडा पडला. सदर मुलाखत टिव्ही ९ च्या युट्युब चॅनेलवर ३ भागांत उपलब्ध आहे.

आताच्या घडीला राज्यात भाजपाची पूर्णतः पीछेहाट झालेली आहे. भाजपाचे जास्तीत जास्त ६५ आमदार निवडून येतील अशी स्थिती आहे. त्यामुळे मराठी मतदारांना खुश करण्यासाठी मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याच्या निर्णयाचे राजकारण केले आहे.

सन २००४ ते २०१४ या दरम्यान पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या युपीए सरकारने, तमिळ (२००४), संस्कृत (२००५), कन्नड (२००८), तेलुगु (२००८), मल्याळम (२०१३), ओडिया (फेब्रुवारी २०१४) या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्यानंतर मोदी सरकारने कालपर्यंत एकाही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला नाही. हे यांचे भाषा प्रेम!

अभिजात भाषेसाठी जे निकष असतात त्यात मराठी भाषा अगदी व्यवस्थित बसत होती यासाठी कित्येकांनी कित्येक वर्षे पूरावे, पाठपूरावा केला होताच .. त्यामुळे मराठीला अभिजात दर्जा द्यायचा होता तो आधीच द्यायला हवा होता पण आता गूजरातला सगळे प्रकल्प घालवून, मराठी शाळा बंद करुन फक्त महाराष्ट्राच्या इलेक्शन डोळ्यासमोर ठेवून दर्जा देऊन मराठी जनतेला खूश करण्याचा प्रयत्न आहे.निवडणूकीच्या तोंडावर असे निर्णय घेवून मते मिळवता येतात हा भाजपचा गैरसमज आहे. भलेही भाजपा मराठी अभिजात दर्जा निर्णयाच्या 'रोपट्याला' आपले नाव देऊ पाहतंय, पण या निर्णयरुपी रोपट्याचे 'बीज' काँग्रेसनेच पेरलंय. यामागील राजकारण मराठी मतदारांनी समजून घेणे आवश्यक आहे. **(साभार)**

लोकसंसद

## घातक विषवल्ली

एक्सपोजर सायन्स आणि एन्व्हायर्नमेंटल एपिडेमियोलॉजी संशोधकांच्या संशोधनात आणि युशोपीयन युनियन जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार.''बिस्फेनॉल-ए''नावाचे रसायन मानवाच्या शरीरात आढळून आले आहे.हे रसायन फूड पॅकेजिंग आणि प्लास्टिक सारख्या घातक पदार्थांमध्ये आढळून येते.या रसायनामुळे मानवाच्या शरीरातील हार्मोन्स वर विपरीत परिणाम होतो आहे.असे संशोधनात निष्पन्न झालेले आहे. फूड पॅकेजिंग मुळे आत्तापर्यंत मानवी शरीरात ३६०० केमिकल्स गेलेली आहेत.त्यातील नव्या संशोधनात १०० रसायने आरोग्यासाठी अत्यंत घातक आहेत असे आढळून आलेले आहे. स्वित्झर्लंड येथे झालेल्या संशोधनात संशोधकांनी असे म्हटले आहे की, घातक अशी पीफास रसायनांनी मानवी शरीरात प्रवेश केलेला आहे. ही घातक रसायने ''फॉरएव्हर केमिकल्स'' म्हणून ओळखली जातात. ही रसायने जी कायमची शरीरात मिसळून राहतात आणि त्याचा परिणाम मानवी शरीर स्वास्थ्यावर होतो आहे.सुमारे १४ हजार रसायनांची यादी करण्यात आली असून,ही रसायने काच, धातू, प्लास्टिक,कागद तसेच इतर माध्यमातुन अन्ना पर्यंत पोहोचतात.त्याच प्रमाणे वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ पॅकिंग करणे सुद्धा धोकादायक ठरू शकते असे संशोधनात नोंदवलेले आहे.फूड पॅकेजिंग मधील घातक ''फॉरएव्हर केमिकल्स'' यांना मानवी आरोग्याच्या दृष्टीने ''नेव्हर एव्हर केमिकल्स'' म्हणून बघितले पाहिजे.कारण ही रसायने मानवी शरीरात विषवल्ली तयार करीत आहेत.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**७ ऑक्टोबर**

१८६६:- 'ब्राण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा' अषा भावनेतून 'साकल्याचा प्रदेष' शोधायला निघालेले आधुनिक मराठी काव्याचे प्रवर्तक, कवी 'केशवसुत' तथा कृष्णाजी केशव दामले यांचा जन्म. करमणूक, मासिक मनोरंजन, काव्यरत्नावली आदी आहेत.नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिध्द होत. 'केशवसुतांची कविता' या संग्रहात १२१ कविता त्यापैकी 'नवा शिपाई', 'आम्ही कोण', 'तुतारी', 'हरपले श्रेय', 'झपूर्झा', 'सतारीचे बोल' अशा अनेक कविता आजही मराठीचा अनमोल ठेवा मानल्या जातात. पारतंत्र्यविरोधाची, राष्ट्रोदयाची आणि आत्मतेज शोधून ते टिकवण्याची जाणीव त्यांच्या अन्य अनेक कवितांतूनही दिसते. **१९१२:-** लेखक, वकील, पत्रकार मनोहर शंकर जावडेकर यांचा जन्म. 'उमलती फुले' ही नाट्यछटा आणि 'फुलदानी' हा कै. ल. भ. भोपटकर यांच्यावर गौरवपर लेखन अषी साहित्य संपदा. **१९१७:-** कविता, बालसाहित्य, गरीबांचे राज्य' ही पटकथा असे विविधांगी लेखन आणि अनेक पुस्तकांचे संपादन करणारे कवी विनायक महादेव कुलकर्णी यांचा जन्म. यांचे 'अश्विनी', 'कमलवेल', 'पहाटवारा', 'पाऊल खुणा' ही काव्ये, 'प्रसाद रामायण' हे रामायणविषयक दीर्घकाव्य, 'विसर्जन' हे खंडकाव्य तसेच 'झुक झुक झुक', 'रंगपंचमी' हे बालसाहित्य आणि राम जोषी कृत लावण्या, वृत्ते व अलंकार हे त्यांचे संपादीत साहित्य. **१९१७:-** अर्थशास्त्र, ना. शास्त्र, राज्यशास्त्र या विषयांवर विपुल प्रमाणात पाठ्यपुस्तक लिहिणारे लेखक, वक्ते प्रा. रामचंद्र महादेव गोखले यांचा जन्म. ३५ हून अधिक पाठ्यपुस्तके त्यांनी लिहिली असून त्यामध्ये 'अर्थविज्ञान परिचय', 'आधुनिक अर्थषास्त्राची मुलतत्त्वे', 'आर्थिक इतिहास', 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र', 'भारताचा आर्थिक इतिहास', 'भारताचा स्वातंत्र्यपूर्व आर्थिक इतिहास','भारतीय अर्थषास्त्र', 'ना. शास्त्र आणि भारतीय शासन पध्दती', 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण १, २', 'राजकीय विचार प्रणाली भाग १,२','अमेरिकी-रशिया', 'बँक व्यवसायाची 'व्यापारशास्त्राची मुलतत्त्वे' अशी ग्रंथ संपदा. मुलतत्त्वे आणि भारतीय बँका', **१९२४:-** गणित आणि शैक्षणिक विषयावर १२५ हून अधिक पुस्तकांचे लेखन करणारे लेखक मनोहर मोरेवर चंपानेरकर यांचा जन्म. ह्यांचे 'गणित गंमती', 'गणित चातुर्य व चमत्कार', 'गणितातील १११ गंमती', 'बुध्दीचातुर्य व चमत्कार', 'बुध्दीमत्ता उलगडा', 'भूमितीतील ३४५ प्रकार' अशी ग्रंथ संपदा. चाचणी-करामती व **१९२७:-** चरित्र कादंबऱ्या, स्त्रियांचे भावविष्व चितारणाऱ्या कादंबऱ्या, प्रवासवर्णन आदी २० हून अधिक पुस्तकांच्या लेखिका मृणालिनी प्रभाकर देसाई यांचा जन्म. 'गीतगोविंदकार जयदेव', 'सॉक्रेटिस', 'माय कलँजेलो', 'कान्होजी आंग्रे', 'अहिल्यादेवी होळकर आदींची चरित्रे त्यांनी कादंबऱ्यांत मांडली. **१९२७ :-** लेखक, सहाध्ययन या मासिकाचे सहाय्यक संपादक दत्तात्रय श्रीष्ण कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांनी 'डॉ. पुणेकर, एक सद्गृहस्थ' या ग्रंथातून कामगार अर्थशास्त्रज्ञ डॉ. पुणेकर यांचे चरित्र साकारले आहे. **१९३१:-** लेखक छायाचित्रकार हितेशचंद्र विश्वनाथ आठल्ये यांचा जन्म. ह्यांनी अनेक मासिकातून कलाकारांच्या छायाचित्रासह मुलाखती घेतल्या. याशिवाय 'निखारे', 'पल्लवी', 'प्रमदा', 'स्वप्ना' ह्या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९३३:-** लेखक, इतिहासाचे अध्यापक प्रा. डॉ. गजानन भाऊराव जोशी यांचा जन्म. पंचवीस एक शोध निबंध तसेच वर्तमानपत्रातून सातत्याने लेखन. ह्यांच्या नावावर 'मानवाची कहाणी' आणि 'मानवाचा इतिहास' ही पाठ्यपुस्तके आहेत. **१९३३:-** लेखक, समाजसेवक आणि आमदार व खासदार असलेले लोकनेते नामदेवराव दिवटे यांचा जन्म. 'संघर्ष ते अध्यात्म मार्गे सत्ता' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिध्द झाले आहे. **२०२०:-**'माणूस' नियतकालिकात राजकीय, सामाजिक विषयांवर 'चाकावरचे विचार' या नावाने सदर लिहिणारे लेखक प्रा. श्री. मा. भावे यांचे निधन. **२०१६:-** बालसाहित्यिक वसंत श्रीपाद निगवेकर यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ ऑक्टोबर

१) श्री. मदन विठ्ठल माळी
थळ, अलिबाग, ७-१०-१९४२

२) श्रीम. शैलजा शशिकांत म्हात्रे
थळ, अलिबाग, ७-१०-१९५६

३) श्रीम. केतकी केशव टिळू
थळ, अलिबाग, ७-१०-१९६१

४) श्री. विजय आनंद महाजन
चेंढरे, अलिबाग, ७-१०-१९४७

५) श्री. एकनाथ नारायण पाटील
कुरूळ, अलिबाग, ७-१०-१९३७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग
ला. सौ. संध्या महेंद्र पाटील, वाढदिवस अलिबाग




आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग शाखा, २६ व्या वर्धापन दिनानिमित्त

# अवैध मटका व्यवसाय तेजीत

## ■ पोलीस, स्थानिक लोकप्रतिनिधींचे पाठबळ? नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण

**। महाड । प्रतिनिधी ।**

**महाडमध्ये कारवाईच्या नावाखाली बंद केलेला मटका व्यवसाय पुन्हा जोमाने सुरु झाल्याचे चित्र आहे. पोलीस आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पाठबळावर ऐतिहासिक शहरात खुलेआम मटका व्यवसाय सुरु असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. यामुळे त्या त्या क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी केली जात आहे.**



ऐतिहासिक महाड शहर ही राजे छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील दिग्गज या महाड क्रांतीभूमीने दिले आहेत. महाडमध्ये वीरेश्वर महाराजांचा छबिना उत्सवदेखील प्रसिद्ध आहे. तर, ऐतिहासिक चवदारतळे येथे प्रतिवर्षी लाखो भीम अनुयायी महामानवाला अभिवान करण्यासाठी येत असतात. प्रतिवर्षी लाखो पर्यटक याठिकाणी भेट देत असतात. अशा ऐतिहासिक शहरात गेली अनेक वर्षे खुलेआम मटका, ऑनलाईन लॉटरी, आणि सोशल क्लबच्या नावाखाली पत्त्याचे डाव रंगत आहेत. याबाबत सातत्याने मटका हे बेकायदेशीर व्यवसाय बंद व्हावेत म्हणून मागणी होत असली, तरी पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. यामुळे गल्लीत दिसणारी मटका दुकाने आता थेट रस्त्यावर टपरी टाकून खुलेआम सुरु करण्यात आली आहेत.

महाड शहरात नवीन येणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तात्पुरती धमक दाखवत हे व्यवसाय काही दिवसांकरिता बंद ठेवले जातात. मात्र, अवघ्या काही दिवसात हे व्यवसाय पुन्हा सुरु केले जातात. त्यातच अनेकजण हे राजकीय पक्षांशी संबंधित असल्याने त्यांना राजकीय पाठबळदेखील लाभत आहे. राजकीय नेत्यांनी बंद म्हटले की हे व्यवसाय बंद आणि सुरु करा म्हटले की सुरु अशी परिस्थिती महाडमध्ये सुरु आहे.

सध्या गल्लोगली मटका आणि ऑनलाईन लॉटरीची दुकाने सुरु झाली आहेत. याबाबत गेली काही दिवसांपासून नागरिकांनी तक्रारी केल्या आहेत. मात्र, पोलीस प्रशासनाने याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला आहे. शहरातील छत्रपती शिवाजी चौक परिसरालादेखील या व्यवसायाने वेढा दिला आहे. त्याचप्रमाणे शहरातील प्रमुख रस्ते, नातेखिंड, महामार्ग याठिकाणी टपऱ्यांमधून मटका दुकाने खुलेआम सुरु झाली आहेत. ग्रामीण भागातील जनता, आदिवासी, तरुण मुले झटपट पैसा मिळवण्याच्या हेतूने मटका आणि ऑनलाईन लॉटरीकडे वळत आहेत. यातून व्यसनाधीनता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांनी काही दिवसांपूर्वी थातूरमातूर कारवाई केली. मात्र, काही दिवसातच हे मटका व्यवसाय पुन्हा सुरू झाले आहेत. संतोष जाधव यांनी यावेळी ज्या ज्या वेळेस अवैध व्यवसाय सुरूच दिसेल. त्या त्यावेळेस कारवाई केली जाईल, असे सांगितले होते. तर दुसरीकडे औद्योगिक पोलीस ठाण्याचे पोलीस हे मात्र आपल्या कार्यक्षेत्रात मटका व्यवसाय सुरूच नाही, असा दावा करत आहेत. मात्र, बिरवाडीमध्ये भरदिवसा भरवस्तीमध्ये हे व्यवसाय सुरू असल्याचे दिसून येते.

### आदिवासी तरुणांना विळखा

**पोटाची भूक भागवण्यासाठी धडपड करत असलेले आदिवासी या मटका दुकानांचे बळी ठरत आहेत. दिवसभर मेहनत करून कमावणारे आपले पैसे मटक्यावर उधळत असल्याने अनेकांचे संसार धोक्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाच्या पाठबळाने हे व्यवसाय सुरु असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे. यामुळे आमचे कोणी काही बिघडवू शकत नाही, अशी भाषा केली जात आहे. मासेमारी, मजुरी करून दिवसभरात कमावलेले पैसे या मटका आणि भिंगरुटसारख्या खेळांवर उधळले जात आहेत.**

### बिरवाडीमध्ये देखील मटका व्यवसाय तेजीत

**महाड औद्योगिक क्षेत्रात असलेल्या कंपन्यांमधून असलेले कामगार, चालक, मजूर हे दिवसा मेहनत करून कमावतात आणि संध्याकाळी ऑनलाईन लॉटरी, मटक्यावर खर्च करतात. बिरवाडीमध्ये जवळपास आठ ते दहा मटका दुकाने असल्याची माहिती स्थानिक नागरिकाने दिली. पोलीस कारवाई कुचकामी ठरत आहे.**



# प्राचीन आसा मशिदीची दुरवस्था

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

चौलला ऐतिहासिक स्थान असून, येथील पुरातन मंदिरे, वास्तू प्राचीन चौलच्या वैभवाचे साक्षीदार आहेत. चौल येथील राजकोट किल्ला मराठ्यांच्या हल्ल्यात जमीनदोस्त झाला. मुसलमान अमदानीत चौलमध्ये प्रांताधिकारांचे मुख्यालय असावे. हे ऐतिहासीक ठिकाण हमामखाना, हजामखाना, कबरस्तान, कलावंतीचा वाडा आदी अनेक वास्तूने सिद्ध होते. चौल मुघल अमदानीत भक्तीस्थान असावे, असे येथील दगडी बांधकामाची आसा मशीद पाहिल्यावर दिसून येते.

चौलनाक्यावरून आग्राव, शितळादेवीकडे जाताना काटकर आळीकडे जाण्याचा मार्ग आहे. येथील हमामखान्याच्या काही अंतरावर कुंडलिका समुद्र खाडी किनारीलगत दगडी बांधकामाची आसा मशिदीचे अवशेष आहेत. चौल काटकर आळीतील नारळ-सुपारीच्या बागायतीकडून या आसा मशिदीकडे जाण्याचा मार्ग आहे. दगडी बांधकामाची आसा मशिदीचे पूर्णतः दुरवस्थेतील अवशेष आढळतात. या आसा मशिदीचे बांधकाम पाहिले असताना मुघल अमदानीत येथे भक्तीचे मोठे स्थान असावे असे दिसून येते.

आसा मशीद पूर्णतः भग्नावस्थेत असून, तिचे दगडी बांधकामाचे अवशेष अद्यापि भक्कम स्थितीत आहे. आसा मशिदीचे उभ्या दगडी खांबावर कोरीव व रेखीव नक्षीकाम पहाण्यासारखे आहे. आसा मशीद पूर्णतः मोडकळीस व दुरवस्थेत असूनसुध्दा तिचे आठ ते दहा दगडी बांधकामाचे अवजड खांब प्राचीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना आहे. पुरातत्व खात्याचे या प्राचीन आसा मशिदीकडे दुर्लक्ष केल्याचे निश्चित जाणवते.

# कोळसा वाहतुकीचे काम स्थानिकांना द्या

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण येथील बंदरातून स्थानिक वाहतूकदारांना डावलून परप्रांतियांच्या अवजड गाड्यांमार्फत कोळशाच्या वाहतुकीचे काम कंपनीतून केले जात आहे. परप्रांतियांकडून होणाऱ्या कोळसा वाहतुकीचे काम यापुढे स्थानिक वाहतूकदारांनाच देण्यात यावे, अन्यथा सोमवारी बंदरातील कंपनीतून होणारी कोळसा वाहतूक बंद करण्याचा इशारा उरण-पनवेल लॉरी मालक-चालक संघटनेने पोलीस, तहसीलदारांना दिला आहे.

उरण येथील एका बंदरातील कंपनीतून मोठ्या प्रमाणावर कोळशाची वाहतूक केली जाते. दररोज या कंपनीतून हजारो टन कोळशाची वाहतूक केली जाते. मात्र, कोळसा वाहतुकीचे काम स्थानिक वाहतूकदारांना डावलून परप्रांतीय वाहतूकदारांकडून करण्यात येत आहे. वाहतुकीचे काम स्थानिक वाहतूकदारांनाच देण्यात यावे यासाठी संबंधित कंपनीकडे मागणी केली आहे.

# मुरुड आगार व्यवस्थापकांचा अजब कारभार

**। कोर्लई । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील मुरुड आगार अनेक समस्यांनी चर्चेत असताना साखर चौथ गणपती विसर्जनानंतर एका समस्येने व्यवस्थापक राहुल शिंदेंचा अजब कारभार उघड झाला आहे. रविवार, दि.२२ सप्टेंबर रोजी जादा प्रवासी असतानाही जादा गाडी सोडण्यास नकार देणाऱ्या निष्क्रिय आगार व्यवस्थापकांची बदली करण्यात यावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. या डेपोमध्ये झालेल्या गोंधळामुळे त्या ठिकाणी मुरुड पोलीस निरीक्षक उदय झावरेंच्या मध्यस्थीमुळे प्रवाशांना गाडी उपलब्ध करून देण्यात आली आणि अखेर प्रवाशांनी मुरुड पोलीस निरीक्षकांचे आभार मानले व आगार व्यवस्थापकांची बदली करण्याची मागणी केली आहे.

सदर घडलेल्या घटनेच्या दिवशी अनेक प्रवासी बुकिंग न मिळाल्याने परत जात होते. त्यावेळी मुरुडचे महेश कारभारी यांनी आगार व्यवस्थापकांना सूचना दिली होती की आज जादा प्रवासी भरपूर असल्याने एक जादा गाडी सोडावी.

# तहसील प्रशासनाकडून ईव्हीएमबाबत जनजागृती

**। तळा । वार्ताहर ।**

तळा येथे तहसील प्रशासनाकडून ईव्हीएम मशीनबाबत जनजागृती करण्यात आली. राज्यात लवकरच विधानसभा निवडणुका लागण्याची शक्यता असून, या निवडणुकीत मतदान करताना नागरिकांना कोणत्याही प्रकारची शंका वाटू नये यासाठी व ईव्हीएम मशीनसंदर्भात पसरत असलेल्या अफवा तसेच नागरिकांचा ईव्हीएम मशीनबाबत असलेला गैरसमज दूर करण्यासाठी तळा शहरातील तळा बसस्थानक येथे तहसील प्रशासनाकडून ईव्हीएम मशीन ठेवण्यात आल्या होत्या. या ठिकाणी नागरिकांना प्रत्यक्ष ईव्हीएम



मशीनचे बटण दाबून तपासणी करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार नागरिकांनी प्रत्यक्ष ईव्हीएमचे बटण दाबून त्यामध्ये कोणत्याही प्रकारची छेडछाड होत नसल्याची खात्री करून घेत ईव्हीएमबाबत समाधान व्यक्त केले. याप्रसंगी तळा तलाठी अंकिता झाडे, तलाठी धायगुडे, कदम, मारुती अडखले, पोलीस कर्मचारी आदी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी घेतली 'विज्ञानाची मजा'

**। रसायनी । वार्ताहर ।**

बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लि. पाताळगंगा व एमजीएम डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञानाची मजा' या विषयावर चित्रा तिरुनल इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल सायन्सेस अँड टेक्नॉलॉजीचे शास्त्रज्ञ 'सी' डॉ. गिजो राज यांनी विज्ञानातील अनेक प्रात्यक्षिके सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मूलभूत साहित्याचा वापर करून विज्ञानविषयक विविध प्रकल्प कसे बनवायचे याचे प्रशिक्षण दिले.

विज्ञानातील नाविन्यपूर्ण प्रतिकृती विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात हाताळता आल्याने विविध प्रयोगांचा मनसोक्त आनंद घेता आला. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थी स्वतः विज्ञानविषयक प्रतिकृती नक्कीच निर्माण करतील. याप्रसंगी एमजीएम डेंटल कॉलेजचे एचओडी डॉ. वैभव ठक्कर, बिर्ला कार्बन कंपनीचे हरीश रावत, सीएसआर प्रमुख लक्ष्मण मोरे, प्रशांत गायकवाड, संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभा देशमुख, शाळेचे मुख्याध्यापक भोमले, विद्या मंदिर सारंग शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक पंडित पाटील, डेंटल कॉलेजच्या प्रशिक्षणार्थी समीक्षा पवार व लकी माहुरे, विज्ञान विषयाचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाबाबत आभार मानले.

# पोलीस, पत्रकारांमुळे समाजात शिस्त

**। पेण । प्रतिनिधी ।**

समाजात पोलिसांबरोबर शिस्त आणण्याचे महत्त्वाचे काम हे पत्रकार करत असतात, राजकीय मंडळी कोणालाही घाबरली नाही तरी ते पत्रकारांना घाबरत असतात. पोलीस आणि पत्रकार हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, परस्परांमध्ये आपुलकीचे संबंध असतील तर समाज सुधारायला वेळ लागणार नाही, असे उद्गार वडखळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी काढले. वडखळ पोलीस



ठाणे आणि पेण तालुक्यातील सर्व पत्रकार बंधू यांच्यामध्ये संवाद बैठकीचे आयोजन वडखळ पोलीस ठाण्याकडून शनिवारी (दि. २८) करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक नरेश थळकर, पोलीस उपनिरीक्षक विजय म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय देवकाते, पोलीस हवालदार अमोल म्हात्रे, पोलीस शिपाई आकाश तसेच स्थानिक पत्रकार उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार दत्ता म्हात्रे यांनी पोलीस प्रशासनाने जनसामन्यांत जाऊन त्यांच्यातील एक व्हावे तसेच पत्रकारांना भेडसावणाऱ्या अडचणींवरही प्रकाश टाकला. पत्रकार संतोष पाटील यांनी समस्यांचा उल्लेख केला. पोलिसांकडून अधिक पारदर्शकता आणि वेळेवर माहिती मिळावी, अशी अपेक्षा केली.

# रेल्वेचे फाटक बंद; विद्यार्थ्यांचे हाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील नेरळ रेल्वे स्थानकाच्या पुढे असलेले फाटक हे दुरुस्तीच्या कामासाठी २६ सप्टेंबरपासून बंद आहे. पाच दिवस फाटक बंद असल्याने नेरळ पूर्व आणि पश्चिम भाग यांचा संपर्क तुटला असून, नेरळ गावात एका बाजूला असलेल्या शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल फाटक बंद असल्याने झाले. ३० सप्टेंबर रोजी फाटकातील दुरुस्तीची कामे मध्य रेल्वेकडून पूर्ण झाली तरी, नेरळकरांचे हाल हाल झाले.

नेरळ या मध्य रेल्वेवरील जंक्शन रेल्वे स्थानकांच्या पुढे कर्जत दिशेकडे मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील ८६ किलोमीटर अंतरावर असलेले फाटक क्रमांक २१ आहे. या फाटकातून दररोज ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या हजारांमध्ये आहे. नागरिकही याच मार्गाटा वापर करतात. दुरुस्तीसाठी फाटक बंद असल्याने हाल झाले.

# वेदक महाविद्यालयामध्ये पालक सभा



**। तळा । वार्ताहर ।**

जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथे पालक शिक्षक समितीच्या माध्यमातून नुकतेच पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य पुरुषोत्तम मुळे होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जयदीप देवरे, फिजिक्स विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विजय रायकर, झुऑलजी विभाग प्रमुख डॉ. शाहीन मिर्झा व कॉम्प्युटर विभाग प्रमुख मनस्वी वाढवळ व सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रभारी प्राचार्य जयदीप देवरे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेताना शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व इतर विभागात विद्यापीठ स्तरावर महाविद्यालय स्तरावर या विभागाच्या यशाची माहिती दिली.

याप्रसंगी साळवी, अडखळे, भोईर, तब्सुम दांडेकर आदी पालकांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम व काही अडचणींसंदर्भात संवाद साधला असता त्यांच्या प्रश्नांना जयदीप देवरे यांनी समर्पक उत्तरे दिली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्री. मुळे यांनी विद्यापीठ स्तरावर नॅक मूल्यांकन, अविस्कर, युवा महोत्सव, आजीवन अध्ययन अशा वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती दिली. पालक व विद्यार्थी यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. संस्था, प्राध्यापक, पालक व विद्यार्थी या चार स्तंभांवर यश अवलंबून असते. पालकांनी वेळोवेळी महाविद्यालयात येऊन पाल्याच्या प्रगतीचा आढावा घेणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय तरटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजय रायकर यांनी केले.

## नेत्रदान पंधरवड्याचा समारोप; नेत्रदात्यांच्या नातेवाईकांचा केला सन्मान

# जिल्हा रूग्णालयात नेत्रदान कृतज्ञता सोहळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**नेत्रदान पंधरवड्याचा समारोप सोहळा तसेच नेत्रदान कृतज्ञता सोहळा जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. सचिन गोमसाळे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला.**

एप्रिल २०२४ पासून जिल्हा रुग्णालयात नेत्रदान झालेल्या नेत्रदात्यांच्या नातेवाईकांचा सन्मानचिन्ह



व सन्मानपत्र देऊन आभार मानण्यात आले. तसेच परिचर्या प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. किरण शिंदे, कान-नाक-घसा तज्ञ डॉ. निशिकांत पाटील, राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, प्रशासकीय अधिकारी डॉ. संगमेश्वर महाजन, नेत्रशल्यचिकित्सक डॉ. शंतनू डोईफोडे, डॉ. अजय इंगळे, डॉ. ईश्वर मेश्राम, अधिसेविका गायत्री म्हात्रे यांच्यासह विविध विभागाच्या परिसेविका, नेत्रचिकित्सा अधिकारी आदी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, मरणोत्तर नेत्रदानाबद्दल नातेवाईकांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये स्व. प्रसाद हिराजी देवरूखकर, स्व. सुनिता दत्तात्रेय सगर, स्व. जितेंद्र अनंत घरत, स्व. शशिकांत तुकाराम पाटील, स्व. कमळाकर दत्तराम वडे, स्व. शकुंतला जगन्नाथ डवले यांच्या मरणोत्तर नेत्रदानाबद्दल नातेवाईकांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन आभार मानण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेत्रविभागाच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# परतीच्या पावसाने शेतीसह गुरांच्या गोठ्याचे नुकसान

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

हस्त नक्षत्र सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून, शेतकरी हवालदिल झाला आहे. मात्र, दरवर्षीप्रमाणे हा परतीचा पाऊस शेतकरी यांच्या मुळावर उमटत असल्याचे दृश्य पाहावयास मिळत आहे. शेती दाण्याने बहरली असून, मात्र आता ती मातीमोल होत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्याचबरोबर ह्या परतीच्या पावसाचा फटका तळवळी येथील शेतकरी देविदास मालकर यास बसला असून, त्यांच्या घरच्या पाठीमागे असलेला गुरांचा गोठा पडल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या वाड्यात गुरे नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला.



सायंकाळ होताच अचानकपणे येत असलेला हा परतीचा पाऊस नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. घराच्या पाठीमागे असलेल्या या बेडा हा कौलारु असून, त्याचबरोबर या बेड्याला उत्तम प्रकाराचे लाकूड असल्यामुळे हा पडल्यामुळे सर्व लाकूड कुजून जात असल्यामुळे आता उभारण्यासाठी लाकूड कोठून आणावे, हा मोठा प्रश्न सध्या शेतकरीवर्गापुढे निर्माण झाला आहे. यामुळे झालेल्या वाड्याची नुकसानभरपाई तातडीने मिळावी, अशी मागणी देविदास मालकर यांनी केली आहे.

**निवडक**

## अनिल भोईर यांना पुरस्कार

**हमरापूर :** आशादीप महिला आधार मंचातर्फे महात्मा गांधी जयंती निमित्त प्रियदर्शिनी फाऊंडेशन संलग्न राष्ट्र सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व संस्थाचा आयोजित 'सत्यमेव जयते रत्नदीप राज्य गौरव पुरस्कार सोहळा' नुकताच मुंबईत पार पडला. यावेळी पेण तालुक्यातील दुरशेत येथील अनिल भोईर यांना सामाजिक कार्यासाठी रत्नदीप राज्यस्तरीय गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. हा सोहळा डॉ. तात्याराव लहाने, निलेश सांबरे, आ. भाई जगताप, आदींच्या उपस्थितीत पार पडला.

## सचिन चव्हाण यांचा सन्मान

**माणगाव :** जयपूर येथे दि.२९ सप्टेंबर रोजी झालेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'इटर्नल व्हॉइस ऑफ डॉक्टर्स' स्पर्धेच्या अंतिम सामन्यात झोनल को. ओर्डीनेटर म्हणून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल व गायनासाठी माणगाव येथील डॉ. सचिन चव्हाण यांना गौरविण्यात आले. हि स्पर्धा डॉक्टरांसाठी असून यात भारतातील व परदेशातील तब्बल ५ हजार डॉक्टर्स सहभागी झाले होते. सीजन १ मध्ये डॉ. चव्हाण व कुटुंबीयांनी सादर केलेल्या कव्वालीला 'मोस्ट इम्प्रेसिव्ह प्रेझेन्टेशन' या पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

## गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

**रसायनी :** रिसे येथील दुर्गामाता मंदिर मातोश्री संकुल येथे सालाबाद प्रमाणे नवरात्र उत्सव साजरा होत आहे. यानिमित्त शनिवारी (दि.५) रोटरी क्लब ऑफ पाताळगंगातर्फे उद्योजकांचा सन्मान सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यावेळी सचिन थोरात, ऋतुजा भोसले व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. दुधे ब्रदर्स यांच्यातर्फे रीस येथे बांधण्यात आलेल्या मंदिराच्या माध्यमातून नवरात्री उत्सवानिमित्त ग्रामीण भागातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करुन त्यांच्या कलागुणांचा सत्कार केला जातो.

## स्त्री कर्तृत्वाचा सन्मान

**म्हसळा :** जागर स्त्रीशक्तीचा, सन्मान कर्तृत्वाचा उपक्रमांतर्गत समाजाभीमुख कार्य करणाऱ्या महिलेचा सन्मान करण्यात येतो. या अनुषंगाने कौस्तुभ करडे यांच्या संकल्पेतून नवरात्रौत्सवात नऊ दिवसाला वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवून समाजासाठी निस्वार्थीपणे कार्य केलेल्या महिलांचा सन्मान करण्यात येतो. यावर्षी तिसऱ्या दिवसाचा मान म्हसळा शहरातील कुंभार समाज अध्यक्ष नंदकुमार गोविलकर यांच्या मातोश्री सुनंदा गोविलकर (७३) यांना देण्यात आला.

## उमाजींना सेवानिवृत्ती पुरस्कार

**पाली सुधागड :** पालीतील जेष्ठ नागरिक व राजिपचे सेवानिवृत्त कर्मचारी उमाजी खंडागळे यांना देवगड अहमदनगर येथे पार पडलेल्या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातून एकमेव 'उत्कृष्ट सेवानिवृत्ती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पेन्शनस असो.चे अध्यक्ष एन.डी. मारणे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रायगड जिल्हा परिषद अलिबाग व पंचायत समिती सुधागड पाली येथे कार्यरत असताना उत्कृष्ट सेवा पुरवल्याबद्दल उमाजी खंडागळे यांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे.

# कोस्टल रोडकरिता वृक्षतोडीला विरोध

## काँग्रेसकडून आंदोलनाचा इशारा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**सीबीडी आणि नेरूळ येथे शेकडो कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या जेटी सिडकोच्या चुकीच्या नियोजनामुळे फेल गेल्या आहेत. हे वास्तव असताना सीबीडी खारघरदरम्यान कोस्टल रोडची गरज काय, असा सवाल काँग्रेस पक्षाने विचारला आहे. विकासाला आमचा विरोध नाही, मात्र कोस्टल रोडसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोडीला विरोध आहे. त्यामुळे सिडकोने कोस्टल रोडच्या निर्णयाचा फेरविचार करावा अन्यथा काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात येईल, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते सय्यद नाशिर हुसेन यांनी सांगितले आहे.**




सिडकोकडून सीबीडी ते खारघरदरम्यान कोस्टल रोड तयार करण्यात येत आहे. यासाठी सुमारे ३० हजार झाडे तोडली जाणार आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या 'मन की बात' या कार्यक्रमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे, असे सांगत आहेत. मात्र, दुसरीकडे विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जात आहेत. विकासाला आमचा विरोध नाही, परंतु विकासाच्या नावाखाली होणाऱ्या भरमसाठ वृक्षतोडीला आमचा विरोध असल्याचे नासीर हुसेन म्हणाले.

पुढे बोलताना नासीर हुसैन यांनी सांगितले की, सिडकोने कोट्यवधी रुपये खर्च करून सीबीडी आणि नेरूळ येथे जेटी तयार केल्या आहेत. त्यात सिडकोच्या नियोजनातील चुकांमुळे प्रवासी जलवाहतूक सुरू होऊ शकली नाही. शिवडी ते न्हावा शेवा अटल सेतूचे बांधकाम सुरू असताना, सीबीडी आणि नेरूळ येथे जेटी तयार करण्याची गरज काय? असा सवाल करत जेटी तयार करताना किमान ६ फूट समुद्र खोली असने आवश्यक आहे. सिडकोने तयार केलेल्या जेटींची खोली फक्त ३ फूट इतकी आहे.

नेरूळ ते खारघर कोस्टल रोड सीबीडी सेक्टर-१५ मधून जात असल्याने, तेथील नागरिकांना त्रास होणार आहे, तसेच महापालिकेच्या वतीने वन टाइम प्लॅनिंग माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करून झाडे लागवड व सुशोभीकरण करण्यात आले आहे. सिडकोने कोस्टल रोडबाबतचा आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा अन्यथा काँग्रेस पक्ष आंदोलन करेल, असे सय्यद नासीर हुसैन यांनी सांगितले.

यावेळी वाशी येथील काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक, प्रदेश काँग्रेसचे सचिव रामचंद्र दळवी, इंटक अध्यक्ष रवींद्र सावंत आदी उपस्थित होते.

# जेएसडब्ल्यूची जलवाहिनी फुटली

**। नागोठणे । वार्ताहर ।**

मुंबई - गोवा महामार्ग चौपदरीकरणाच्या कामाला नागोठणे परिसरात काहीसा वेग झाला आहे. मात्र, हे काम करताना ठेकेदार असलेल्या कल्याण टोल प्लाझा कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून हलगर्जीपणा सुरू असल्याचे वारंवार दिसून येत आहे. अशातच शनिवारी (दि.५) सकाळी दहा वाजता डोलवी येथील जेएसडब्ल्यू कंपनीला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी फुटली. नागोठण्याजवळील हॉटेल कामतजवळ जेसीबी यंत्राने नुकसान केल्याने हजारो लीटर पाणी वाया गेले आहे.




जेएसडब्ल्यू कंपनीला नागोठण्यातील केटी बंधाऱ्यातून कंपनीच्या पंप हाऊसमधून ११०० एम.एम. व्यासाच्या जलवाहिनीद्वारे उच्च दाबाने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या जलवाहिनीला काही ठिकाणी व्हॉल्व्ह बसवण्यात आले आहेत. असाच एक व्हॉल्व्ह नागोठण्याजवळील हॉटेल कामतजवळून गेलेल्या व सर्व्हिस रोडलगत असलेल्या जलवाहिनीला बसविण्यात आला आहे. शनिवारी सकाळी याच सर्व्हिस रोडलगत महामार्ग चौपदरीकरण ठेकेदार कंपनीच्या यंत्राद्वारे गटार खोदण्याचे काम सुरू असताना जलवाहिनीच्या व्हॉल्व्हला धक्का लागून तो तुटला. त्यामुळे खूप उंचावर पाण्याचे फवारे उडण्यास सुरुवात झाली. त्यानंतर कंपनीची तांत्रिक टीम घटनास्थळी पोहोचली व त्यांनी जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरू केले. तोपर्यंत मोठ्या प्रमाणात पाणी वाहून ते लगतच्या शेतकऱ्यांच्या शेतात गेल्याने त्यांचे नुकसान झाले. जलवाहिनीच्या दुरुस्तीचे व व्हॉल्व्ह बदलण्याचे हे काम दुपारी सुमारे तीन वाजवण्याच्या सुमारास पूर्ण झाले. जलवाहिनी दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण होण्यासाठी जेएसडब्ल्यचे अधिकारी चंद्रशेखर करंजकर, जितेंद्र खरसांबळे व रवी पाटील यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

## मुलींच्या आरोग्य संदर्भात कार्यक्रम

**खांब :** मुलींच्या सदृढ आरोग्यासाठी सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीजतर्फे मुलींच्या आरोग्या संदर्भात कार्यक्रम संपन्न झाला. माधुरी सणस यांच्या संकल्पनेतून तसेच इंटरनॅशनल असो. संस्थेच्या माध्यमातून 'मासिक पाळी दरम्यान आरोग्य, स्वच्छता आणि मानसिक स्वास्थ्य' या विषयावर शिबीर आयोजित केले होते.

# विद्यार्थ्यांना सायबर क्राईमचे धडे

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आजच्या काळात मोबाईलचा वापर खूपच मोठ्या प्रमाणात केला जातो. प्रौढांप्रमाणे आता शालेय विद्यार्थीसुद्धा यामध्ये कमी नाहीत. मोबाईलच्या अतिवापरामुळे अनवधानाने अथवा इतर शोध घेताना मुलांकडून अनभिज्ञ अपराध होऊ शकतो. अशा घटना विद्यार्थ्यांकडून होऊ नये यासाठी अंशू फाऊंडेशनतर्फे नांदगाव हायस्कूल येथे सायबर क्राईमबाबत विशेष मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.



यावेळी अंशू फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश गुंड, संगणक तज्ज्ञ स्वाती घाग तसेच, योगेश पाटील, सागर राऊत, भरत चव्हाण, राहील घलटे, निशा बिरवाडकर, नियती ठमके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निलेश गुंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वेब प्रोफाईल, फेक अकाऊंट, हॅकिंग, ऑनलाईन जुगार, खोट्या अफवा, मॉर्फिंग म्हणजे फोटोमध्ये बदल घडवून आणणे, सायबर दहशतवाद आदीबाबत विस्तृत प्रमाणात माहिती दिली. त्याचप्रमाणे आपला पासवर्ड दुसऱ्या व्यक्तीला देऊ नये, अनोळखी व्यक्तीला फोटो देऊ नका किंवा त्याच्याशी चर्चासुद्धा करू नका. मोबाईल गरज असेल तरच वापर करावा.

यावेळी विद्यार्थ्यांना सायबर हेल्प लाईन नंबर देण्यात आला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना चांगली माहिती मिळाली असून, भविष्यात विद्यार्थी मोबाईलचा वापर अतिशय काळजीपूर्वक करून आपली वाटचाल यशस्वीरित्या करतील, असा विश्वास मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# भात संशोधन केंद्राची स्वच्छता मोहिम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रातर्फे महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत भात संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण संशोधन केंद्र परिसर स्वच्छ करण्यात आले. कर्जत भात संशोधन केंद्रात कार्य करणारे सर्व अधिकारी तसेच कर्मचारी वर्गाने या मोहिमेत सहभाग घेतला होता. ही स्वच्छता मोहिम प्रशासकीय कार्यालय, आय.एफ.एस. मॉडेल, प्रक्षेत्र, प्रवेशद्वार इत्यादी परिसर झाडून स्वच्छ केला.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश,** व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सअॅपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.
- **अलिबाग-मांडवा-रेवस मार्गावरील लोणारे (मानी फाटा)** येथील एस.के. हॉलिडे होम कॉटेज भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९०४९१४७५६८
- **अलिबाग आणि परिसरातील BSC पदवीधर उमेदवारांना** Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी त्वरित संपर्क करा. ९६८९८९२१२१
- **पोयनाड येथील ब्लॉक विकणेबाबत :** पोयनाड येथील नवीन बिल्डींग हरि ॐ सोसायटी 1st फ्लोअर ब्लॉक, रोडटच ६३० एरिया रेडी पोझीशन विकणे आहे. संपर्क : ९४२२५३४३२०
- **फक्त दोन वर्षे जुनी, एकहाती वापरलेली सुस्थितीतील** VOLKSWAGEN TIGUAN गाडी (२००० CC/ रनिंग २२,००० किमी) योग्य किंमत आल्यास विकणे आहे. संपर्क- सुबोध- ७२७६५९१३०२
- **अलिबाग स्टँडपासून दोन किलोमीटर परिसरात** डबल टॉयलेट, कार पार्किंग असलेला २ BHK फ्लॅट रेडिपोझिशन, प्रशस्त सोसायटीमध्ये विकत घेणे आहे. फ्लॅट १० वर्षापेक्षा जास्त जुना नसावा. एजंट चालतील. मो. ९९७०४७३९२२
- **अलिबाग परिसरामध्ये पर्यटकांच्या वर्दळीच्या ठिकाणी** फर्निचरसहीत हॉटेल/कॉटेज भाडेतत्वावर चालविण्यास घेणे आहे. एजंटस्चे स्वागत मो. ९९२३०३६१५६
- **मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.** Akshay Agencies Pimpalbhat Near Suruchi Hotel (अलिबाग परिसर आणि १० km mtr परिसराकरीता) मो. ९५०३३५५८८६
- **१५०० स्क्वे. फूटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे** आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४ संपर्काची वेळ- दुपारी ४ ते रात्री ९
- **घरकामासाठी बाई पाहिजे** वेळ-सकाळी ८.३० ते १२.३० ठिकाण पंतनगर, अलिबाग संपर्क : ८०९७२०५९३९/९४२२३७२१५४
- **सुपरवायझर पाहिजे :** वात्सल्य ट्रस्ट, शिशुगृह अलिबाग येथे पूर्णवेळ महिला सुपरवायझरची आवश्यकता आहे. सदर उमेदवाराचे शिक्षण १२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे. सदर उमेदवार ३५ ते ४० वयोगटातील अलिबाग शहर परिसरातील असावी व स्वत:चे दुचाकी वाहन असल्यास प्राधान्य. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व प्रमाणपत्रसह संस्थेच्या कार्यालयात गुरुवार दिनांक १७/१०/२०२४ रोजी दुपारी ठीक १२.००वाजता उपस्थित राहावे. पत्ता. वात्सल्य ट्रस्ट, घर नं १५१०, मयूर बेकरी मागे अलिबाग, रायगड ४०२२०१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**



# शाळांमध्ये वॉटर प्युरिफायरचे वाटप

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

ऑक्टोबर सेवा सप्ताहाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या सौजन्याने वॉटर प्युरिफायरचे वाटप नुकतेच मुरुड तालुक्यातील मांडला, वळके या शाळेत करण्यात आले.

यावेळी डिस्ट्रिक्ट व्हॉइस गव्हर्नर प्रवीण सरनाईक, साईट फर्स्टचे डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन एस.एन. मूर्ती, अ‍ॅड. गौरी म्हात्रे, महेश कवळे, अंकिता म्हात्रे, प्रदीप नाईक, गिरीश म्हात्रे, अविनाश राऊळ, अतुल वर्तक, महेंद्र पाटील, संतोष पाटील, संजय मोरणकर, मनोज ढगे, प्रकाश देशमुख, चित्रा वर्तक, केंद्रप्रमुख सुनील पाटील, सुधीर नाईक यांच्यासह शिक्षक आणि लायन्स परिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आवास येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब मांडवा, दिलखुश क्रीडामंडळ आवास, ग्रुप ग्रामपंचायत आवास, मुंबई हेल्थ केअर सेंटर, तेरणा हॉस्पिटल व लायन्स हेल्थ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.५) आवास येथील रा.जि.प. प्राथमिक शाळेत लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष जितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोफत आरोग्य तपासणी शिबीर, नेत्र तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. याअंतर्गत २२७ जणांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या, तसेच ३५ जणांनी रक्तदान केले.



यावेळी द्वितीय उपप्रांतपाल प्रवीण सरनाईक, लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, अनिल म्हात्रे, नयन कवळे, रिजन चेअरपर्सन विजय वनगे, झोन चेअरपर्सन प्रीतम गांधी, लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष ऋग्वेद ठाकूर, सचिव निकिता पाटील, खजिनदार प्रदीप पाटील, सुबोध राऊत, विद्या अधिकारी, अमिश शिरगावकर, अमरेश शिरगावकर, स्मितल शिरगावकर, साक्षी शिरगावकर, चंद्रकांत मल्हार, मोहन पाटील, सुनीता पुरो, सुधीर पुरो, सुमित पाटील, जितेश्री ठाकूर, लायन्स क्लब अलिबागच्या अध्यक्ष अ‍ॅड. गौरी म्हात्रे, सचिव अंकिता म्हात्रे, लायन्स क्लब श्रीबाग, सेंटिनिअलचे अध्यक्ष अ‍ॅड. के.डी. पाटील, ए.एस.एन. मूर्ती, महेंद्र पाटील, भगवान मालपाणी आदी लायन्स उपस्थित होते.

## पिकाचे क्षेत्र वाढवण्यासाठी महिलांचा पुढाकार

# रोवळा होणार नाचणीचे गाव

**। तळा । वार्ताहर ।**

**तालुक्यातील रोवळा या गावात कृषी विभागाकडून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत नाचणी पिकाची प्रात्यक्षिके सुधारित पद्धतीने राबवण्यात येत आहेत. नाचणी पिकाची प्रात्यक्षिके राबवण्यासाठी गावातील महिलांनी पुढाकार घेतला असून, रोवळा येथील संतोषी माता महिला शेतकरी गट या गटातील महिलांनी एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर सुधारित जातीच्या नाचणीची लागवड केली आहे.**

नाचणी सुधारित जातीचे उत्पादन व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून घेण्यात येत आहे. यासाठी रोवळा गावातील कृषी सहाय्यक गोविंद पाशीमे व आत्मा बीटीएम सचिन लोखंडे यांच्याकडून वेळोवेळी महिलांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच, या महिला बचत गटांकडून नाचणीपासून विविध खाद्यपदार्थ तयार करण्यात येणार आहेत. यासाठी कृषी विभागाकडून प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. रोवळा गावास भविष्यात 'नाचणीचे गाव' म्हणून ओळख निर्माण करण्याचा या महिला बचत गटाचा मानस आहे. नुकतेच शासनाकडून आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष साजरे करण्यात आले. या अंतर्गत नाचणी पिकाचे क्षेत्र वाढवण्यासाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमातूनच प्रेरणा घेऊन या महिला संघटित होऊन नाचणीचे पीक घेत आहेत.



रोवळा गावातील लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. गावामध्ये शेती सोडून इतर कोणतेही साधन नसल्यामुळे शेतकऱ्यांचे गावामधून शहराकडे स्थलांतर होत आहे. हे स्थलांतर थांबवण्यासाठी महिलांचा प्रयत्न सुरू आहेत. नाचणीपासून बनवलेल्या उपपदार्थांची विक्री करून गावातील गरजू, बेरोजगार मुला-मुलींना रोजगार मिळणार आहे. यामुळे रोवळा गावची

> **कृषी विभाग नाचणी पिकाचे क्षेत्र वाढवण्यासाठी प्रयत्न करत असून, त्याला रोवळा व परिसरातील गावातून चांगले यश येताना दिसून येत आहे.**
> **– गोविंद पाशीमे, कृषी सहाय्यक**

ओळख नाचणीचे गाव म्हणून तयार होण्यास मदत होणार आहे. सध्या पाच हेक्टरवर नाचणीचे पीक घेतले जाणार आहे. यासाठी रब्बीमध्ये कडधान्ये कृषी विभागाकडून पुरविण्यात येणार आहे. रोवला येथील बचत गटातील जवळपास २१ महिला नाचणी पिकाची लागवड करणार आहेत.

## नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची जंगल भ्रमंती

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

जागतिक वन्यजीव सप्ताह निमित्त फणसाड वन्यजीव अभयारण्यात मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील नूतन नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जंगल भ्रमंती करून जैवविवितेचा मनमुराद आनंद लुटला. सहाय्यक वन संरक्षक मनोहर दिवेकर, वनक्षेत्रपाल नारायण राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली नर्सिंग कॉलेजच्या ४८ विद्यार्थ्यांनी अभयारण्यात निसर्ग गाणी, बशी तलाव व निरीक्षणासाठी उभारलेले मनोऱ्यांना भेट देत वन्यप्राणी, पक्षी, किटक, कोळी, रंगी बेरंगी फुलपाखरे, बेडूक तसेच वृक्षांच्या विविध प्रजाती व वेली, रान फुलांची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. यावेळी ग्रीन वर्क्स ट्रस्टच्या स्वयंसेवकांनी देशी व विदेशी पक्षांची शास्त्रोक्त माहिती दिली.

# तरूणाई ऑनलाईन लॉटरीच्या विळख्यात

। उरण । वार्ताहर ।

'शो युवर स्किल' असे आवाहन करून तरुणांना ऑनलाईन लॉटरीच्या विळख्यात ओढण्याचे काम सध्या सुरु आहे. ऑनलाईन लॉटरीच्या नावावर सुरु असलेल्या जुगार अड्ड्यांवर लॉटरी खेळण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी होत असून, पोलीस याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याने लॉटरी विक्रेत्यांचे फावले आहे.

शहरात साधारणतः २०० अनधिकृत लॉटरीचे सेंटर असून, महिन्याला लाखोंचा व्यवसाय या सेंटरमध्ये होतो. समाजातील मटका व जुगार या व्यसनांना प्रतिबंध घालून त्यातून होणाऱ्या जनसामान्यांची फसगत टाळण्यासाठी १९६९ साली राज्य वित्त विभागाने महाराष्ट्र राज्य लॉटरीची स्थापना केली. यामुळे बेरोजगार तरूणांना व्यवसायाची संधी उपलब्ध झाली. या लॉटरी व्यवसायावर सरकारकडून २८ टक्के जीएसटी आकारण्यात आला. यामुळे लॉटरीची व्यवसायाला मंदीची झळ बसली आणि बरेच व्यवसाय बंद पडले. याचाच फायदा घेऊन अनधिकृत ऑनलाईन लॉटरी विक्रेत्यांनी जागोजागी आपली दुकाने सुरू केली आहेत. या ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. कर्जबाजारीपणामुळे अनेकांनी आत्महत्या करून आपले जीवन संपवले आहे.

## विनापरवाना व्यवसाय सुरू

महाराष्ट्र राज्यात कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असलेली नोंदणी आहे. हे महाराष्ट्र राज्य दुकाने आणि आस्थापना कायद्यांतर्गत म हानगरपालिकेद्वारे नियंत्रित केले जाते. हे एक प्रमाणपत्र आहे जे तुम्हाला विशिष्ट ठिकाणी तुमचा व्यवसाय करण्याचे अधिकार प्रदान करते. हा परवाना तुमच्याकडे नसल्यास नगरपालिकेकडून दंड आकारण्यात येतो. हे लॉटरी सेंटर एखाद्या विभागात एक छोट्याशा दुकानात विनापरवाना किंवा विनाबोर्ड लावता हा व्यवसाय सुरू करतात. यांच्यावर पालिकेतर्फे कोणतीही कार्यवाही केली जात नाही.




## पोलीस प्रशासनाचा कानाडोळा

हे लॉटरी सेंटर एकप्रकारचा जुगाराचा अड्डाच आहेत. यामुळे कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. कित्येकांना आपला जीव गमवला आहे. तरीही पोलीस प्रशासन या व्यवसायाकडे कानाडोळा करत आहे. उरण – नवी मुंबई परिसरात सध्या विन गेम आणि प्ले लॉटरीच्या नावावर ऑनलाईन जुगारद मोठ्या प्रमाणात सुरु असून, लॉटरीचे तिकीट खरेदी करताना आम्ही आमच्या जबाबदारीवर हा खेळ खेळत असल्याचा उल्लेख छापून ही तिकिटे विकली जात आहेत.

# नवरात्रौत्सवात नारळ दरात वाढ

। पनवेल । वार्ताहर ।

शारदीय नवरात्री उत्सवाला प्रारंभ झाला आहे. ऐन सणासुदीच्या काळात नागरिकांना महागाईचे चटके सहन करावे लागत असून, आता नारळाच्या किंमतीतही वाढ झाली आहे. ऐन सणासुदीच्या काळात खाद्यतेल आणि डाळी महागले आहेत. त्याचबरोबर नवरात्री उत्सवात सर्वाधिक मागणी असणाऱ्या नारळांच्या किंमतीमध्येदेखील मोठी वाढ झाली आहे. नारळाच्या ठोक भावांमध्ये ८ ते १० रुपयांनी वाढ झाली असून, किरकोळ बाजारात १० ते १५ रुपयांनी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. महाराष्ट्र राज्यात मोठ्या उत्साहात नवरात्रौत्सव साजरा केला जातो. यादरम्यान नवरात्री उत्सव काळात मोठ्या संख्येने नारळाला मागणी असते. गणपती सणात वाढलेले नारळ दर पितृपक्षात नियंत्रणात आले होते.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १. रमेश अमृत पाटील, २. कल्पना रमेश पाटील यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १० | ७ | ०-१२-९० | ०-७७ |
| ११ | ७ | ०-०४-३० | ०-०२ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०७/०९/२०२४

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता- गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

# रस्त्याची साईडपट्टी हरवली गवतात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहरातील मुख्य रस्त्यांच्या बाजूला पावसाळ्यात उगवलेले गवत वाढले आहे. रस्त्याच्या बाजूच्या साईडपट्टीवर गवत आडवे आले आहे. यामुळे रस्त्याने चालणारे विद्यार्थी आणि सकाळी मॉर्निंग वॉकसाठी ये-जा करणाऱ्यांना अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पालिका प्रशासनाने रस्त्यावर आलेले गवत बाजूला करावे, अशी मागणी स्थानिक नागरिक संतोष थोरवे यांनी केली आहे.

कर्जत चार फाटा ते डॉ. नानासाहेब धर्माधिकारी कर्जत प्रवेशद्वारापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला साईडपट्टीवर खूप मोठ्या प्रमाणात गवत व झाडी झुडपे झाली आहेत. गेल्या वर्षी नवरात्री उत्सवापूर्वी नगरपालिकेने दोन्ही बाजू साफ केल्या होत्या. या वर्षी नवरात्र उत्सव सुरू होऊन दोन दिवस उलटले तरी अजूनही साफाई केलेली नाही. अनेक राजकीय पक्षांचे नवरात्री शुभेच्छा बॅनर रस्त्यावर गर्दी करून लावले आहेत. परंतु, एकही कार्यकर्त्याला किंवा पुढाऱ्याला हि समस्या दिसून आली नाही.



या परिसरातून रोज शेकडो शाळकरी मुले याच रस्त्याने ये-जा करत असतात. साईडपट्टीला गवत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. मोठमोठी अवजड वाहने या रस्त्याने वेगाने येत-जात असतात. त्यामुळे पालिकेने तात्काळ रस्त्यावर आलेले गवत कापून टाकावे, अशी मागणी स्थानिक नागरिक संतोष थोरवे यांनी केली आहे.

# उड्डाणपुलासाठी महामार्ग रोखणार

। पेण । प्रतिनिधी ।

कोलेटी पेण येथे उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाचा गाळा कमी रुंदीचा ठेवल्याने वरप, पाबळ भागात जाणारी एसटी बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

पाबळखोऱ्यातील तमाम आदिवासी व कुणबी मराठा समाजात तसेच कोलेटी परिसरात तीव्र असंतोष पसरला असून या अन्याया प्रित्यर्थ मुंबई-गोवा महामार्गावरील कोलेटी येथे मंगळवारी (दि.८) मंगळवारी सकाळी ११:०० वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

मुंबई-गोवा महामार्ग व कोलेटी येथे असणारा कमी उंचीच्या अरुंद असणाऱ्या पुलाची तक्रार शेतफळस कोलेटी कोलेटीवाडी यांनी अनेक वेळा केली आहे. यासंदर्भात काही दिवसांपूर्वी मंत्र्यांच्या सोबत संबंधित अधिकाऱ्यांचा दौरा झाला असूनही या रस्त्याचे काम संबंधित अधिकाऱ्यांकडून चालूच आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी या पुलाची उंची कमी करून त्याचा पाया कमी केल्याने दर पावसाळयात या गाळयात पुराचे पाणी शिरणार आहे. कारण दर पावसाळयात अतिवृष्टीमुळे नागोठण्यानंतर अंबा नदीचे पाणी या गावात शिरते. याची जाणीव येथील वृध्द शेतकऱ्यांनी देउनही रस्त्याचे अधिकारी येथील भौगोलिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता आपली मनमानी करीत आहेत.

पाबळ खोरे हा पूर्णतः आदिवासी विभाग असून येथे जांभोशीपर्यत दिवसाच्या एसटीच्या फेऱ्या आहेत. या भागात आदिवासी मोठ्या प्रमाणात भाजीपाला व्यवसाय करतात. येथे मोठ्या प्रमाणात पोल्ट्री फार्म आहेत, वीट उदयोग केला जातो. यामुळे या कमी उंची व अरूंद पूल असल्याने केवळ एसटी सेवाच बंद होणार नाही. तर, मालाची वाहतूक करणारे मोठे ट्रक देखील जाणार नसल्याने वीट पोल्ट्री उद्योगाची प्रचंड नुकसान होणार आहे.

या अन्यायाविरूध्द स्थानिक संस्थेसोबत, सर्वपक्षीय कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी देखील या रस्ता रोको आंदोलनात सहभागी होणार असल्याचे गजानन भोईर यांनी सांगितले आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

सा. बां. (आदिवासी) विभाग, ठाणे
संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक-१५, सन २०२४-२५

कार्यकारी अभियंता, सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे दूरध्वनी क्र. ०२२-२५४१००४६ हे ई-निविदाद्वारे (ऑनलाईन) खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील आदिवासी विकास विभागाकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता व विद्युत ठेकेदार तसेच नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (रू. लक्ष) | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | शासकीय आश्रमशाळा सुधागडपाली ता. सुधागड, जि. रायगड येथील मुलांचे वसतीगृह इमारतीस अंतर्गत व बाह्यविद्युतीकरण करणे | ७७.१६ | वर्ग-अ विद्युत |
| २ | शासकीय आश्रमशाळा सुधागडपाली ता. सुधागड, जि. रायगड येथील मुलींचे वसतीगृह इमारतीस अंतर्गत व विद्युतीकरण करणे | ४२.५९ | वर्ग-अ विद्युत |
| ३ | शासकीय आश्रमशाळा अघई ता. शहापूर जि. ठाणे येथील शालेय इमारतीस अंतर्गत विद्युतीकरण करणे | ४७.२५ | वर्ग-अ विद्युत |
| ४ | शासकीय आश्रमशाळा भोपोली ता. विक्रमगड जि. पालघर येथील मुलींचे वसतीगृह इमारतीस अंतर्गत विद्युतीकरण करणे. | ४३.२२ | वर्ग-अ विद्युत |
| ५ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा पेंढरघोळ ता. शहापूर जि. ठाणे येथे वर्ग-३ कर्मचारी व वर्ग-२ कर्मचारी निवास्थानाचे उर्वरीत कामे करणे. | १२३.०१ | वर्ग-४ व त्यावरील |
| ६ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा टाकीपठार ता. शहापूर, जि. ठाणे येथे शाळेचे प्रवेशद्वार ते मेन रोडपर्यंत काँक्रीट रस्ता तयार करणे. | ४९.८६ | वर्ग-५ व त्यावरील |
| ७ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा मढ ता. मुरबाड जि. ठाणे येथे पोहचमार्ग लगत संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | ४२.२९ | सु.बे.अ. |
| ८ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा भिनार ता. भिवंडी, जि. ठाणे येथे पोहचमार्ग लगत संरक्षक भिंतींचे बांधकाम करणे. | ३३.०२ | सु.बे.अ. |

✼ निविदा डाऊनलोड करण्याचा दिनांक दि. ०७/१०/२०२४ रोजी ते दि. १४/१०/२०२४ पर्यंत.
✼ ई-निविदा उघडण्याचा दिनांक १६/१०/२०२४
✼ सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवर enrolled करणे आवश्यक आहे.

जा.क्र.साबां.(आ) विठा/ठाणे/निविदा/क्रं.१५/४०६९
सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे
सा.बां. आवार, स्टेशनरोड, ठाणे-४०० ६०१
ईमेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com
दिनांक :- ०१/१०/२०२४

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण घुडे, २) श्री. रामदास लक्ष्मण घुडे, ३) श्री. भाईचंद लक्ष्मण घुडे, ४) सौ. आशा भगवान बांगर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणेः-

**मौजे - जामरूंग तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ८ | २ / ड | ०.२०.०० | ०.८९ |

सदरच्या जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदूंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०७/१०/२०२४
ऑफीसः शॉप नं. २४, मार्वल, क्षिप्रा रेसिडेन्सी, मुर्दे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मु. गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. केतन धनसुख ठकरार यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत विकत देण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ३७१ | ४ | ३०५-८० | ३०-५८ |
| ३७१ | ५ | ३०४-०० | ३०-४० |
| ३७१ | ६ | २९०-९० | २९-०९ |

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०७/१०/२०२४

**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता- शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड. मो. - ९३२५०६००३७

### महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग,
कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे कार्यालय
रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,
सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन- ४०२१०७

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in/elraigad.ee@gmail.com
Website : www.mahapwd.gov.in
दूरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८
जा.क्र.का.अ./राविवि/निविदा-१/३५७८/सन २०२४
दिनांक : २७.०९.२०२४

**फेर ई-निविदा सूचना क्र. १४ सन २०२४-२५**

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र. ८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२ दिनांक २८/०६/२०२४

कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड- ४०२१०७ दूरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ हे संदर्भाचे अधिन राहून महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. कार्यकारी अभियंता (विद्युत), रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रू. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| १. | Est.No. RAESD/OW/126 /2024-25 Providing & Passenger lift and Electrical installation to lift shaft for Proposed Buliding of PWD Division Panvel, Subdivision No.-1, Subdivision No.2, subdivision Bhingari, at Bhingari, Tal-Panvel, Dist- Raigad | रू.११,९६,४०५/- | दिनांक ०२.१०.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. १२०००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधिक १८% GST | दिनांक ०९.१०.२०२४ सकाळी ११.०० |
| २. | Est.No. RAESD/OW/120 /2024-25 Providing Internal EI, External EI, Solar Roof top system, water pumps, DG set, CCTV system and Fire Alarm system at Rural Hospital Tala, Dist- Raigad | रू.७७,४२,२१२/- | दिनांक ०२.१०.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. ७७५००/- ४) निविदा शुल्क रू. १०००/- अधिक १८% GST | दिनांक ०९.१०.२०२४ सकाळी ११.०० |
| ३. | Est.No. RAESD/OW/124 /2024-25 Providing CCTV Surveillance System for OPD Building at District Civil Hospital Alibag, Tal-Alibag, Dist- Raigad | रू.९,१८,१९७/- | दिनांक ०२.१०.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. ९२००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधिक १८% GST | दिनांक ०९.१०.२०२४ सकाळी ११.०० |
| ४. | Est.No. RAESD/OW/125 /2024-25 Providing CCTV Surveillance System for IPD Building at District Civil Hospital Alibag, Tal-Alibag, Dist- Raigad | रू.८,७७,५७०/- | दिनांक ०२.१०.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. ८८००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधिक १८% GST | दिनांक ०९.१०.२०२४ सकाळी ११.०० |
| ५. | Est.No. RAESD/OW/71 /2024-25 Providing CCTV Surveillance System for A1 and A2 building at RCF Colony Alibag, Tal-Alibag, Dist- Raigad | रू.१०,२८,७००/- | दिनांक ०२.१०.२०२४ सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक ०७.१०.२०२४ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत | १) निविदापूर्व बैठक नाही २) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे. ३) इसारा रक्कम रू. १०३००/- ४) निविदा शुल्क रू. ५००/- अधिक १८% GST | दिनांक ०९.१०.२०२४ सकाळी ११.०० |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासूचनांमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड - ४०२१०७ दूरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ या कार्यालयातील सूचना फलक.
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यांसह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र. १ मध्ये जोडण्यात यावे.)
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

**(स. कट्टी)**
कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. पेण-रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून श्री. अभय अण्णा काकडे रा. ५५४/१५० वरळी, बी.डी.डी चाळ डॉक्टर जी.एम. भोसले मार्ग, दुरदर्शन वरळी, मुंबई यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|---|
| दमयंती दिलीप ठक्कर भक्ती दिलीप ठक्कर | ५८ | १२ | ०-१०-०० | १००-०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :-०७/१०/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुधीर रघुनाथ म्हात्रे यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**- संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड. | ३५८ | ०-४६-५० पैकी ०-२३-२५ | ४.२५ |

अलिबाग,
दिनांक : ०६/१०/२०२४.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट
कृष्णवंदन- २ ब्राम्हणआळी, कन्याशाळेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१

**निवडक**

### रोहित आरसीबीचा कर्णधार?

**मुंबई :** आयपीएल २०२५ पूर्वी भारतीय संघाचा वनडे आणि कसोटी कर्णधार रोहित शर्माबद्दल अनेक अटकळ बांधल्या जात आहेत. गेल्या मोसमात मुंबई इंडियन्सने रोहितला कर्णधारपदावरून हटवले होते. हार्दिक पंड्याला कर्णधारपद मिळाले पण चाहत्यांना ते आवडले नाही. मैदानावरही संघ पूर्णपणे अपयशी ठरला. रोहित आणि व्यवस्थापन यांच्यात मतभेद असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. रोहित रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा कर्णधार होण्याची शक्यता असल्याचेही म्हटले जात आहे.

### इंग्लंडची बांगलादेशवर मात

**नवी दिल्ली :** आयसीसी वूमन्स टी २० वर्ल्ड कप २०२४ स्पर्धेतील सहाव्या सामन्यात इंग्लंड क्रिकेट टीमने विजयी सुरुवात केली आहे. इंग्लंडने बांगलादेशवर २१ धावांनी मात करत विजयाचं खातं उघडलं. इंग्लंडच्या गोलंदाजांनी शानदार बचाव करत बांगलादेशला १०० धावांच्या आतच रोखलं. इंग्लंडने बांगलादेशला विजयासाठी ११९ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र बांगलादेशला २० ओव्हरमध्ये ७ विकेट्स गमावून ९७ धावाच करता आल्या. इंग्लंडने पॉइंट्स टेबलमध्ये थेट पहिल्या स्थानी झेप घेतली.

### रैनाने अमेरिका गाजवली

**अमेरिका :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी अष्टपैलू खेळाडू सुरेश रैनाने २०२० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. मात्र, सध्या तो अमेरिकेत चर्चेत आहे. रैना नॅशनल क्रिकेट लीग आयोजित सिक्सी स्ट्राइक्स स्पर्धेत खेळत आहे. या स्पर्धेत तो न्यूयॉर्क लायन्सकडून यूनिव्हर्सिटी ऑफ टेक्सस डॅलास येथे खेळत आहे. ५ ऑक्टोबर रोजी न्यूयॉर्क लायन्स आणि लॉस एंजेलिस वेव्हज यांच्यात सामना खेळला गेला, ज्यामध्ये सुरेश रैनाने बांगलादेशचा स्टार अष्टपैलू शाकिब अल हसनलाही चांगलेच धुतले.

### राकेश बेदी यांची निवड

**रसायनी :** राकेश बेदी वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२४ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. उरण येथील भारतीय नौदलातील राकेश बेदी यांची जागतिक जू-जित्सू चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. रायगड आणि मुंबईतून ७७ किलोमध्ये त्यांची निवड झाली आहे. राकेश मनोज बेदी हे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जू-जित्सु आणि ज्युडो खेळाडू आहेत. तसेच ते प्रमाणित फिटनेस प्रशिक्षक आहेत. त्यांची ग्रीस-हेरकिलोन शहर येथे २१ ते ३१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान झालेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२४ साठी निवड झाली होती.

### पहिल्या विजयाची नोंद

**मुंबई :** भारत पेट्रोलियम, रिझर्व्ह बँक, न्यू इंडिया एन्शोरन्स, युनियन बँक, मुंबई पोलीस, इन्सोर कोट यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित विशेष व्यावसायिक गटात साखळीतील पहिल्या विजयाची नोंद केली. सेंट्रल बँकेला मात्र संमिश्र यश मिळाले. दादर(पूर्व) येथील भवानीमाता क्रीडांगणावर सुरू असलेल्या पुरुषांच्या अ गटात गत विजेत्या भारत पेट्रोलियमने कस्टमला ४०-३३ असे नमविले. विश्रांतीला २७-१८ अशी घेणाऱ्या पेट्रोलियमला नंतर मात्र कस्टमने चांगली लढत दिली. त्यामुळे संघाचे मनोबल उंचावले आहे.

# ईराणी चषकावर मुंबईचा कब्जा



**■ २७ वर्षांची प्रतिक्षा संपली**
**■ राणेच्या नेतृत्वात धमाकेदार कामगीरी**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अजिंक्य रहाणे याच्या नेतृत्वात मुंबई क्रिकेट टीमने इतिहास रचला आहे. मुंबईने सामन्यातील पाचव्या आणि शेवटच्या दिवशी पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर २७ वर्षांनी इराणी कपवर नाव कोरलं आहे. मुंबईची इराणी कप जिंकण्याची ही १५ वी वेळ ठरली आहे.

मुंबईकडून या स्पर्धेत पहिल्यांदाच द्विशतक करणारा सर्फराज खान हा 'मॅन ऑफ द मॅच' या पुरस्काराचा मानकरी ठरला. तर मुंबईकडून दुसऱ्या डावात तनुष कोटीयन याने शतकी खेळी केली. त्यामुळे सामना बरोबरीत सुटला. अजिंक्य रहाणे याने मुंबईला आपल्या नेतृत्वात रणजी ट्रॉफीनंतर इराणी कप जिंकून आपला दबदबा कायम ठेवला आहे. सर्फराज खान आणि तनुष कोटीयन ही जोडी मुंबईच्या विजयाची शिल्पकार ठरली. तनुषने दुसऱ्या डावात मुंबईचा डाव गडगडलेला असताना पहिलवहिलं शतक झळकावलं. तनुषच्या या शतकी खेळीने मुंबईचा डाव सावरला. मुंबईने पहिल्या डावात १२१ धावांची आघाडी मिळवली होती. मात्र दुसऱ्या डावात मुंबईची ८ बाद १७१ अशी स्थिती झाली होती. मुंबईसाठी एकट्या पृथ्वी शॉ याचा अपवाद वगळता टॉप आणि मिडल ऑर्डरमधील सर्वच अपयशी ठरले. पृथ्वीने ७६ धावा केल्या.

रेस्ट ऑफ इंडियाच्या सारांश जैन याने चौथ्या दिवशी मुंबईला झटके देत बॅकफुटवर ढकललं होतं. मात्र त्यानंतर तनुष कोटीयन आणि मोहित अवस्थी या दोघांनी नवव्या विकेटसाठी १५८ धावांची भागीदारी केली, ज्यामुळे मुंबई मजबूत स्थितीत पोहचली. दुसऱ्या सत्रातील अखेरच्या क्षणी मोहितने अर्धशतक झळकावलं. यानंतर दोन्ही संघांनी हस्तांदोलन केलं आणि यासह सामना बरोबरीत सुटला. इराणी कप स्पर्धेत सामना बरोबरीत सुटल्यास पहिल्या डावातील आघाडी असलेल्या संघाला विजयी घोषित केलं जातं. मुंबईने दुसऱ्या डावात ८ बाद ३२९ धावा केल्या. त्याआधी मुंबईने सर्फराज खान याच्या नाबाद २२२ धावांच्या जोरावर ५३७ पर्यंत मजल मारली. तर कॅप्टन रहाणे याने ९७ आणि तनुषने ६४ धावा केल्या. तर श्रेयस अय्यरने ५७ धावांचं योगदान दिलं. मुंबईने रेस्ट ऑफ इंडियाला पहिल्या डावात ४१६ धावांवर रोखत १२१ ची आघाडी घेतली. रेस्ट ऑफ इंडियाकडून अभिमन्यू इश्वरन याने १९१ तर ध्रुव जुरेलने ९३ धावा केल्या. मुंबई प्लेइंग ईलेव्हन : अजिंक्य रहाणे (कर्णधार), पृथ्वी शॉ, आयुष म्हात्रे, श्रेयस अय्यर, सरफराज खान, हार्दिक तामोरे (विकेटकीपर), शार्दुल ठाकूर, शम्स मुलानी, तनुष कोटियन, मोहित अवस्थी आणि एम जुनेद खान.

रेस्ट ऑफ इंडिया प्लेइंग ईलेव्हन : ऋतुराज गायकवाड (कॅप्टन), देवदत्त पडिक्कल, अभिमन्यू ईश्वरन, साई सुदर्शन, इशान किशन, ध्रुव जुरेल (विकेटकीपर), मानव सुथार, सरांश जैन, यश दयाल, प्रसीध कृष्णा आणि मुकेश कुमार यांचा समावेश होता.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा

## ■ सचिनने केले अभिनंदन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकरने सोशल मीडियावर अभिनंदनाची पोस्ट शेअर केली आहे. अभिजात भाषेचा दर्जा म्हणजे मराठी भाषेला मिळालेला हा सन्मान आहे, असे सचिनने पोस्टमध्ये नमूद केले. ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय केंद्र सरकारने घेतला. सरकारने घेतलेला हा निर्णय महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेमध्ये आनंद पसरवणारा ठरला आहे. गेल्या ६० वर्षांपासून होणाऱ्या मागणीला अखेर यश आले आहे. त्यामुळे मराठी भाषा आता सर्वदूर पोहचेल. मराठी सोबतच पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने नेमकं काय फायदा होणार? अभिजात भाषेचे निकष काय असतात? केंद्र सरकारच्या या ऐतिहासिक निर्णयामुळे मराठी माणसांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व स्तरांमधून सरकारच्या या निर्णयाचे कौतुक होत आहे. अशातच भारतीय दिग्गज खेळाडू सचिन तेंडूलकरनेही आपल्या मातृभाषेबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. सोशल मीडियावरील पोस्टमध्ये सचिन म्हणाला, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी मनाला अभिमान वाटतो. हा सन्मान आपल्या संस्कृतीच्या योगदानाला दिलेली ओळख आहे. बरोबरच असमिया, बंगाली, पाली, आणि प्राकृत या भाषांनाही हा सन्मान मिळाल्याबद्दल अभिनंदन! जास्तीत जास्त लोकांना या सुंदर भाषांचे सौंदर्य अनुभवता येईल! अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे नेमकं काय होणार? जेव्हा केंद्र सरकार एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा म्हणून घोषित करते तेव्हा त्या भाषेच्या समृद्धीसाठी अधिक निधी दिला जातो. माहितीनुसार, भाषेच्या समृद्धीसाठी केंद्र सरकार दरवर्षी २५०-३०० कोटी रुपयांचे अनुदान देते. भाषेचा प्रचार करण्यासाठी भाषा भवन उभारणे, ग्रंथ, साहित्याच्या प्रचार करण्यासाठी मदत करणे, ग्रंथालय उभारणे, भाषेच्या प्रचारासाठी आर्थिक मदत मिळते. दरवर्षी भाषेतील विद्वानांसाठी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातील. प्रत्येक विद्यापीठात भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र उभारण्यात येईल. देशभरातील विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकण्याची व्यवस्था तसेच सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिजची स्थापना केली जाईल.

# जिल्हास्तरीय कबड्डीत पीएनपीचा दबदबा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



● (छायाचित्र : अमोल नाईक)

क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परीषद रायगड, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग अंतर्गत बुधवारी (दि.२) पाली येथील जिल्हा क्रीडा संकुलात जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय वेश्वीतील १९ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत मुंबई विभाग स्तरीय कबड्डी स्पर्धेत झेप घेतली आहे. या घवघवीत यशाबद्दल संथेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, क्रीडा प्रशिक्षक तेजेश म्हात्रे, महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, उपप्राचार्य निशिकांत कोळसे, प्रा. दिनेश पाटील, प्रा. ओमकार सावरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सार्थक म्हामुणकर आर्चरीत प्रथम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**



रसायनी येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड आयोजित शालेय जिल्हास्तरीय आर्चरी स्पर्धेचे गुरूवारी (दि.३) आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत माणगाव येथील शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी सार्थक म्हामुणकर याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मीडियम स्कूल माणगावचा इयत्ता सहावीचा विद्यार्थी सार्थक म्हामुणकर याने इंडियन राऊंड १४ वर्षाच्या आतील वयोगटात सुवर्णपदक पटकावले आहे. यानंतर त्याची कर्नाळा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स पनवेल येथे होणाऱ्या शालेय विभागीय आर्चरी स्पर्धेकरीता निवड झाली आहे.

सार्थकने उज्वल यश मिळविल्याने ॲड. राजीव साबळे, कृष्णा गांधी, नरेंद्र गायकवाड, अरुण पवार, मनीषा मोरे, प्रतिक गायकवाड आदींनी अभिनंदन केले आहे.

# जेएसएम महाविद्यालयात स्वरक्षणाचे धडे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयामार्फत शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या बौध्दीक व शारिरीक क्षमता वाढीसाठीदेखील वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणजे जेएसएम महाविद्यालय व डिफेन्स अकॅडमी अलिबागमार्फत विद्यार्थ्यांना स्वरक्षणाचे धडे देण्यात आले.

या उपक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सध्या घडलेल्या उरण, बदलापूर आणि कोलकत्तामधील बलात्कार आणि हत्याकांडानंतर स्वसंरक्षण ही काळाची गरज बनली आहे. याच पार्श्वभूमीवर डिफेन्स अकॅडमीमार्फत जेएसएम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण आणि संस्कारक्षम व सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. आपल्या आजूबाजूला असलेल्या विकृत प्रवृत्तीच्या व्यक्ती किंवा व्यक्ती समूहामुळे सर्वसामान्य माणसाच्या मनातील आपण सुरक्षित असण्याची भावना कमी होण्यास सुरुवात झाली आहे. अशा व्यक्तींना उत्तर देण्यासाठी प्रत्येकाने स्वतःचे संरक्षण करण्याएवढे सक्षम असणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांसाठी स्वरक्षणाचे धडे देण्याचा निर्णय घेतला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन स्वरक्षणाचे धडे घेतले. यावेळी समरेश शेळके, अनिकेत म्हामुणकर, प्रणय म्हात्रे, अमिषा भगत, अक्षय पाटील, हर्षल अहिरे यांनी प्रशिक्षण देण्याबरोबरच मार्गदर्शन केले.

# रितेश यादवची 'कांस्य' कमाई

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**




मुरूडमध्ये कार्यरत असलेले पोलिस शिपाई रितेश यादव यांनी छत्तीसगड येथे झालेल्या पोलिस वेटलिफ्टिंग क्लस्टर २०२४ स्पर्धेत पॉवरलिफ्टिंग ५९ वजनात कांस्यपदक पटकावले आहे. त्यांना मान्यवरांच्या हस्ते कांस्यपदक व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातुन २, महाराष्ट्रातुन ५० तर देशातुन १८०० पोलिस सहभागी झाले होते. पॉवरलिफ्टिंग ५९ वजनात १२ खेळाडूंनी सहभाग भाग घेतला होता. यामध्ये रितेश यादव यांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. तर, सहकारी पोलिस शिपाई रोहित पाटील यांना ६६ वजनात चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. रितेश यादव यांनी सांगितले की, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हाला ही संधी मिळाली. यामुळे या स्पर्धेला एक ऊर्जा मिळाली.

# नागोठण्यात शक्तीतुरा नाचांचा सामना

**। नागोठणे । वार्ताहर ।**



रायगड जिल्ह्यासह संपूर्ण कोकणात प्रसिद्ध असलेल्या व सध्या लोप पावत असलेल्या शक्तीतुरा नाचांच्या कार्यक्रमाचे आयोजन नागोठण्यातील वरवठणे येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागोठणे शहरासह नागोठणे ग्रामीण परिसरातील अबाल वृद्ध नागरिक, तरुण वर्ग व महिला वर्गाने उस्फूर्त दाद देत तुफान गर्दी केली होती. यामुळे वरवठणे गावची ग्रामदेवता श्री चौंडेश्वरी मातेच्या प्रांगणात हा शक्तीतुरा नाचांचा सामना चांगलाच रंगलेला पहायला मिळाला.

नवरात्र उसवानिमित्त नागोठण्याजवळील वरवठणे गावची जागृत ग्रामदेवता श्री चौंडेश्वरी मातेच्या मंदिरासमोरील प्रांगणात आयोजित केलेल्या शक्तीतुरा नाचाच्या सामन्याचे रत्नागिरी जिल्ह्यातील खेड-कशेडी येथील शक्तिवाले सुकाई नाच मंडळाच्या गायिका दिपाली शिंदे व रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील तिसे येथील तुरेवाले वीर हनुमान नाच मंडळाचे शाहीर वसंत भोईर यांचा समावेश होता. कै. वामनशेठ म्हात्रे यांच्या स्मरणार्थ किशोर म्हात्रे यांच्याकडून आयोजन करण्यात आले होते.

शक्तीवाले नाच मंडळाच्या गायिका दिपाली शिंदे यांच्याकडून पहिल्या बारीला सुरुवात झाली. यानंतर त्यांनी एकाहून एक सरस गीते, गवळण सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यानंतर तुरेवाले गायक शाहीर वसंत भोईर यांनी दिपाली भोईर यांनी सादर केलेली गवळण व इतर गाण्यांना प्रतिउत्तर म्हणून आपल्या खास शैलीत सदाबहार गीते सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली. शाहीर वसंत भोईर यांनी प्रेक्षकांमधून आलेल्या खास फरमाईश सुद्धा पूर्ण करीत प्रेक्षकांची दाद मिळविली.

# करटेत अलिबागच्या खेळाडूंची बाजी

## सुवर्ण पदकांसह कांस्य पदकांची लुट



**। अलिबाग । प्रतिनिधी।**

नवी मुंबई येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत अलिबागच्या कराटेपट्टूंनी उत्तम कामगिरी बजावली आहे. त्यांनी सुवर्ण पदकासंह कांस्य, रौप्य अशी २५ हुन अधिक पदके मिळविली आहेत. प्रशिक्षण राहूल तावडे यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी कराटे स्पर्धेत बाजी मारलेली आहे. त्यांच्या या कामगिरी बद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

या स्पर्धेचे संयोजन युनिव्हर्स कराटे मार्शल आर्ट्स अकॅडमी इंडियामार्फत झाले. यावेळी प्रमुख संघटक शिहान ढवळे यांची उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत ८६६ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यावेळी कटा व कुमिते या दोन्ही प्रकारात अलिबागच्या कराटेपट्टूंनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यात नृपाल पाटील, वीर अजिंक्य, आरोही पाटील, शाल्विया चौलकर, पृथा जाधव, श्रीनिष मडवी, देवांश खोत, स्वयंम पाटील, श्रिया ठोंबरे, दिव्या पाटील, प्रिश गिरी, आहान गुरव, ऋग्वेद लोटे, मृदू भगत, तहा इकबाल, सुयश घेरडे, शुभ्रा घेरडे, श्लोक पाटील, वरद पाटी, निरज चवरकर, निष्ठा मनोहर, अवनी पाटील, रितिका हिवाळे, देवांश रोकडे या कराटेपट्टूंनी सुवर्ण, कांस्य व रौप्य पदके मिळविली आहेत.

तसेच, जपान शीटोऱ्यू कराटे-डो इंडिया या संस्थेला बेस्ट डिसिप्लिन टिमला चषक देऊन सन्मानित करण्यात आले. व्यवस्थापक व प्रशिक्षक म्हणून तनिष्क तावडे यांनी जबाबदारी पार पाडली.

## श्री स्वामी समर्थ महिलांची विजयी सलामी

# शिवनेरी सेवा मंडळ कबड्डी महोत्सव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**





मुंबई शहर कबड्डी असोसिअशनच्या मान्यतेने दादर (पूर्व) येथील भवानीमाता क्रीडांगणावर शिवनेरी सेवा मंडळ आयोजित ५६व्या कबड्डी महोत्सवाला सुरूवात झाली आहे. या कबड्डी स्पर्धेला श्री स्वामी समर्थ गोलफादेवी प्रतिष्ठान यांच्या महिला गटातील विजयाने प्रारंभ झाला. यावेळी कुमार गटात साऊथ कॅनरा, श्रीराम विश्वस्त, शिवमुद्रा, विजय क्लब यांनी विजयी सलामी दिली.

शिवनेरी सेवा मंडळ आयोजित कबड्डी महोत्सवात श्री स्वामी समर्थने उद्घाटनीय सामन्यात शताब्दी स्पोर्ट्सचा ३६-०९ असा सहज पराभव केला. स्वामी समर्थने आक्रमक सुरुवात करीत पूर्वार्धात २ लोण देत २३-०५ अशी आघाडी घेतली. शेवटी २६ गुणांच्या मोठ्या फरकाने आपला विजय साकारला. दुसऱ्या सामन्यात गोलफादेवी प्रतिष्ठानने अमर भारतला ४२-२१ असे नमविले. विश्रांतीला २४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या गोलफादेवीला नंतर मात्र अमर भारतने बऱ्यापैकी लढत दिली.

कुमार गटात साऊथ कॅनराने यंग प्रभादेवीचा ४७-२६ असा पाडाव केला. यंग प्रभादेवीकडून जयेश कोंढाळकरने एकाकी लढत दिली. श्रीराम विश्वस्तने अंकुश पारवे, अथर्व यांच्या चढाई पकडीच्या खेळाने सिद्धी प्रभा फाऊंडेशनचा ४०-२४ असा सहज पराभव केला. शिवमुद्रा प्रतिष्ठानने अमर हिंद मंडळाला ४१-२१ असे नमवित आगेकूच केली. विजय क्लबने संस्कृती प्रतिष्ठान वर ४०-२४ असा विजय मिळविला. रोहन राज, शिवम यादव यांच्या चतुरस्त्र खेळाने विजय क्लबने पूर्वार्धात २१-१४ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात तोच जोश कायम राखत १६ गुणांनीआपला विजय साकारला. इतर सामन्यात नवोदित संघाने विजय बजरंग व्यायाम शाळेला ४३-३० असे, तर एस.एस.जी. फाऊंडेशनने गुड मॉर्निंगला ४७-३५ असे पराभूत करीत आगेकूच केली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)